म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक राजाराम रामकृष्ण भागवत | सन १८८ |
|---|---|---|
| चरित्र | | |
| संग्रहालय क्रमांक ३८ ३९८ | पुस्तकाचें नांव शिवछत्रपतींचे चरित्र | |


३८

चरित्र

म. ग्रं. सं. ठाणें

[...]क पुरुषांची चरित्रमाला.

# [...]तीचें चरित्र.



## शिवाजी भोसले,

शा०च्या १६ व्या शतकांतील महाराष्ट्रांच्या पादशहानीची प्रतिष्ठा करणारा महापुरुष.

अभिषेक शा० शके १५९६

जन्म शा० शके १५४९. मृत्यु शा० शके १६०२.

चरित्र लिहिणार

राजाराम रामकृष्ण भागवत.

चैत्र शुक्ल १ शालि० शके १८११.

(सन १८८९).

किंमत ३ आणे.

# शिवछत्रपतींचें चरित्र.

## प्रास्ताविक भाग.

१–मऱ्हाठे, मऱ्हाठी व महाराष्ट्र ही त्रयी पुष्कळ जुनाट आहे. २–देवगिरीची गादी अविंधांनीं साफ बुडविल्यानंतरची मऱ्हाठी मंडळाची स्थिति. ३–शालि० शकाच्या सोळाव्या शतकाच्या आरंभीं मऱ्हाठ्यांमध्यें पुनः चळवळीस सुरवात होऊन दुसऱ्या उत्कर्षकाळास आरंभ झाला.

### १–मऱ्हाठे, मऱ्हाठी व महाराष्ट्र ही त्रयी पुष्कळ जुनाट आहे.

मऱ्हाठे व त्यांची भाषा ही द्वयी अगदीं आजकालची, असा पुष्कळ इंग्रज लोकांचा समज आहे. पण हा समज चुकीचा आहे. शिवाजी महाराजांचे पूर्वीं मऱ्हाठे हें नांव नव्हतें किंवा मऱ्हाठी भाषा ह्मणून नव्हती, असें कांहीं नाहीं. जो मऱ्हाठ्यांचा व मऱ्हाठीचा उत्कर्ष शिवाजी महाराजांचे जन्मापासून सुरू झाला, तो त्यांचा उत्कर्षकाळ कांहीं पहिलाच नव्हे. हा उत्कर्षकाळ दुसरा उत्कर्षकाळ होय. देवगिरीस जी जाधवांची गादी स्थापन झाली, त्या गादीनें अर्वाचीन मऱ्हाठ्यांच्या व मऱ्हाठीच्या पहिल्या उत्कर्षकाळास सुरवात केली. ही गादी बल्लाळ नांवाच्या पुरुषानें शालिवा० शके १११४ व्या वर्षीं स्थापिली. बल्लाळ

व त्याचा मुलगा जयंतपाळ या दोहोंचीही राजधानी जोगाईचें आंबें ही होती. जयंतपाळास ब्रह्मज्ञानाचा उपदेश करण्यासाठीं मुकुंदराजानें विवेकसिंधु नांवाचा वेदान्तपर ग्रंथ अर्वाचीन मऱ्हाठींत रचिला. जयंतपाळाचा मुलगा सिंघण हा मोठा पराक्रमी राजा झाला व त्यानें देवगिरी मुक्कामीं गादी नेली. देवगिरीस हल्लीं दौलताबाद ह्मणतात. सिंघणाचा मुलगा दुसरा जयंतपाळ हा बापाच्या पूर्वींच वारला, ह्मणून त्याच्या पश्चात् जयंतपाळाचा मुलगा कन्हर हा शालि० शके ११६८ त गादीवर बसला. हाही मोठा पराक्रमी निपजला. कन्हर वारला तेव्हां त्याचा मुलगा रामचंद्र, हा लहान होता ह्मणून कन्हराचा धाकटा बंधु महादेव गादीवर बसला. हेमाडपंत नांवाचा ब्राह्मण महादेवाच्या कारकीर्दीत राज्याचा सर्व कारभार पहात असे. महादेवाच्या पश्चात् रामचंद्र गादीवर बसला. रामचंद्रास अर्वाचीन इतिहासकार रामदेवराव ह्मणतात. रामदेवरावाचा शालि०शके ११९४ तील लेख आहे, त्यावरून रामदेवरावाच्या कारकीर्दीच्या आरंभीं हेमाडपंतच मुख्य प्रधान होता, असें ठरतें. हेमाडपंतानें मोडी लिपि दक्षिणेंतून आणिली, व लिहिण्यास सोपी ह्मणून आपल्या देशांत सुरू केली. घर बांधण्याची एक अपूर्व पद्धतिही हेमाडपंतानें घातली. रामदेवरावाच्या कारकीर्दीत ज्ञानेश्वरप्रभृति चार भावंडें व नामदेव वगैरे बरेच संतकवी झाले, त्यांचे मऱ्हाठी भाषेवर अविस्मार्य उपकार झाले आहेत. देवगिरीकर जाधवांनीं पूर्वीचा एकचक्रीपणा मोडून राज्यास एकसूत्रीपणा आणण्यास आ-

रंभ केला. पूर्वींचे जे राजे होऊन गेले ते सर्व चक्रवर्ती झाले. चक्रवर्ती राजांस हवें तसें करतां येत नाहीं, कारण त्याच्या राज्यरूपी एका विस्तीर्ण चक्राच्या आंत क्रमानें लहान होत जाणारीं वंशपरंपरागत राज्यकारभारी, गांवकारभारी वगैरे कारभाऱ्यांचीं चक्रें असतात तीं अनेक प्रसंगीं त्यांस नडतात व त्यांच्या मनःप्रवृत्तीच्या ओघास कुंठित करून क्वचित् हटवितातही. एकसूत्री राज्यांमध्यें सूत्रधार एक असतो. या सूत्रधाराची सत्ता निरंकुश असते, कारण कीं तो मात्र एक अधिकाराच्या संबंधानें पिढीजादा असतो. इतर कारभारी पिढीजादे नसून केवळ सूत्रधाराच्या मर्जीवर त्यांचा कारभारीपणा अवलंबून असतो. ह्मणून सूत्रधाराच्या निरंकुशपणाचा अंश त्यांच्यामध्यें फारसा राहूं शकत नाहीं, व त्यामुळें एकल्या सूत्रधाराच्या चांगुलपणावर व दुष्टपणावर दरोबस्त रयतेचें व कारभाऱ्यांचें हिताहित सर्वस्वीं अवलंबून असतें. पूर्वीं एकचक्री राज्यें जशीं आपल्या देशांत तशींच पश्चिमेस आंग्लद्वीप, फ्रान्स वगैरे द्वीपांतरीं व देशांतरीं होतीं. असल्या एकचक्री राज्यांत देसाई, देशमुख वगैरे देशकारभारी किंवा कोठारी, भांडारी वगैरे राज्यकारभारी असत, त्यांचा कुळांवर प्रसंगीं पुष्कळ जुलूम होई, व मुख्य चक्रवर्तीकडेस फारशी दाद लागत नसे. देवगिरीकरांनीं आपल्या राज्याचा एकचक्रीपणा मोडून एकसूत्रीपणा केला, व देसाई वगैरे देशकारभाऱ्यांचा पिढीजादपणा मोडून टाकल्यामुळें रयतेस विशेष सुख होऊं लागलें. हा एकसूत्रीपणाचा जो पाया घातला तो चां-

गला मजबूत होण्यास बरींच वर्षें हवीं होतीं. पण दुर्दैवानें अविद्याची लाट मोठ्या जोरानें रामदेवरावाच्या कारकीर्दीच्या अखेरीस महाराष्ट्रमंडळावर कोसळली, व एकसूत्रीपणाचा नाजूक पाया देवगिरीकरांनीं नुक्ताच घातला होता तो पुढें ढांसळून मंडळभर कोठेंही कांहींच मर्यादा राहिली नाहीं, व तेणेंकरून जिकडे तिकडे अव्यवस्था माजली. वल्लाळ जाधवानें गादीची स्थापना केली, तेव्हांपासून आह्मां मऱ्हाठ्यांच्या अर्वाचीन काळास आरंभ झाला. या काळीं मऱ्हाठ्यांमध्यें ब्राह्मणांनीं तसेंच ब्राह्मणेतरांनीं जातिभेदाकडेस यत्किंचितूही लक्ष न पोंचवितां केवळ मंडळाच्या हिताकडेस दृष्टि ठेवून आपलें व आपल्याबरोबर महाराष्ट्रमंडळाचेंही नांव गाजविलें. सर्वां भूतीं देव सारखा असून परमार्थदृष्ट्या अभेदच सत्य, हा शंकराचार्यांचा मन उन्नत करणारा उन्नत सिद्धान्त जयंतपाळास कळावा ह्मणून मुकुंदराज नांवाच्या ब्राह्मणानें विवेकसिंधु रचिला. चार भावंडें तर मोठीं ज्ञानी व भक्त झालीं. मुक्ताबाई आपण कौमार व्रत स्वीकारून राहिली. नामदेव वगैरे ब्राह्मणेतरांनींही अभंग किंवा ओव्या रचून मऱ्हाठ्यांच्या भाषेस प्रौढत्व आणिलें. ज्ञानेश्वर वगैरे ब्राह्मणमंडळी झाली ती जातिभेदाची मुळींच पर्वा न करितां मोठ्या प्रेमानें व आवेशानें सर्वां भूतीं देव सारखा आहे या वेदान्त सिद्धान्ताचा गजर करीत सदुदाहरण घालून नामदेव वगैरे ब्राह्मणेतर मंडळी झाली तिच्या पायीं पडे. पद्मनाभ नांवाच्या ब्राह्मणास सिंहणाचा मोठा आश्रय होता. सिंहणाच्या मुलाचें नांव कन्हर होतें, म्हणून पद्मनाभाचा मुलगा

 २।-३६

बासिदेव यानें आपल्या मुलाचें तेंच नांव ठेविलें. क्षत्रियाचें व राजपुत्राचें नांव आपल्या मुलास ब्राह्मणानें दिलें, ही गोष्ट एका प्रकारें दोन्ही मोठ्या जाती एकमेकांस किती मिळून असत हें उघड करून दाखविते. कन्हर क्षत्रियाप्रमाणें कन्हर ब्राह्मणानेंही अनेक युद्धांत तलवारबहादुरी करून आपलें नांव गाजविलें. हेमाडपंत जितका मुत्सद्दी होता तितकाच विद्वान् व कल्पक होता. सारांश, ह्या काळीं दरोबस्त जातींच्या मऱ्हाठ्यांचें जसें राज्यप्रकरणीं तसें धर्मप्रकरणीं व गृहस्थितिप्रकरणीं पाऊल पुढें पडत चाललें होतें, व सर्व प्रकारची चळवळ महाराष्ट्रमंडळांत सुरू झाली होती.

या अर्वाचीन काळाच्या पूर्वींही मऱ्हाठे व त्यांची भाषा ही द्दयी होतीच. पण अर्वाचीन मऱ्हाठीचा हा काळ नव्हे. ज्या प्राकृत भाषेपासून आपली हल्लींची मऱ्हाठी निघाली तीस प्राचीन ग्रंथकर्ते माहाराष्ट्री ह्मणत. या माहाराष्ट्रीचे दोन काळ करितां येतात— एक शालिवाहनी काळ व दुसरा शालिवाहनाच्या पुढचा काळ. शालिवाहनी काळांत महाराष्ट्रमंडळाची राजधानी पैठण नगरी गोदावरीच्या तीरीं होती. हर्ष विक्रमादित्य नांवाचा उज्जयिनचा मोठा पराक्रमी राजा होता. त्याची व शालिवाहन वंशाचा जो त्या काळीं राजा होता त्याची नर्मदेवर एक तुंबळ लढाई झाली तींत हर्ष विक्रमाचा मोड झाला व महाराष्ट्र लोक शालिवाहनाचा शक मोजूं लागले. शालिवाहनवंशांतील एका राजानें सप्तशती नांवाचा गाथामय ग्रंथ माहाराष्ट्री भाषेंत रचिला आहे. शालिवाहनशकाच्या तिसऱ्या

शतकांत किंवा त्या सुमारास शालिवाहनवंश बुडाला. लौकरच बदामी मुक्कामीं चाळुक्यांची गादी स्थापन झाली. शालि० शके १०६ या वर्षाचा पुलकेशी चाळुक्याचा एक शिलालेख आहे. हर्षवर्धन नांवाचा उत्तरापथाचा चक्रवर्ती व पराक्रमी राजा पुनः दक्षिणेंत स्वारी करण्यास ह्मणून आला होता. त्यास नर्मदेवर पुनः पुलकेशीनें चांगला मार दिला, व परत पिटाळून लाविलें. त्संग नांवाचा चिनई यात्रेकरी या काळीं आला होता, तो पुलकेशीस महाराष्ट्राचा राजा ह्मणतो. तेव्हां महाराष्ट्र देश व महाराष्ट्र लोक हे या काळीं निःसंशय नांवाजलेले होते. जर लोक व देश ही द्वयी नांवाजलेली होती, तर भाषाही महाराष्ट्री निःसंशय असली पाहिजे. पण शालिवाहनाचा वंश बुडाल्यापासून सर्वत्र अंतःकोप माजला होता, त्यामुळें कवितेकडेस लक्ष देण्यास लोकांस सवड सांपडली नाहीं, अशी शंका येते. पूर्वींच्या महाराष्ट्रमंडळांत जसा अस्सल महाराष्ट्र अंश होता तसा तेलंगी अंशही होता. हे दोन अंश हल्लींच्या काळीं निरनिराळे होण्याच्या वेणा आपल्या महाराष्ट्र भूमीस लागल्या. त्यामुळें चाळुक्यांच्या हातीं कर्नाटकमंडळ एकवटण्यास आरंभ झाला. कर्नाटकमंडळ एकवटं लागलें [illegible] असें पाहून अस्सल महाराष्ट्रमंडळही [illegible] एकवटू लागलें. लौकरच राठोडांच्या हातीं [illegible] महाराष्ट्रमंडळाची कळ आली व कर्नाटकमंडळ सहजच निराळें पडलें. हर्षवर्धनाचा पराभव करणाऱ्या पुलकेशीचा चुलता मांग चाळुक्य यानें बदामी येथील सुंदर वैष्णव लेणीं शालि० शकाच्या पांचव्या शतकाच्या अखेरीस कोरिवलीं. वेरूळचीं भव्य शैव लेणीं गोविंद

राठोडानें शालि० शकाच्या आठव्या शतकाच्या पहिल्या पादांत किंवा त्या सुमारास कोरिवली. सारांश, पूर्वीचें विस्तीर्ण महाराष्ट्रमंडळ याकाळीं मऱ्हाठीमंडळ व कानडीमंडळ या दोन मंडळांनीं विभागलें, व त्यामुळें जशी अर्वाचीन मऱ्हाठीच्या तशीच अर्वाचीन कानडीच्या जन्मास सवड सांपडली. या काळीं अर्वाचीन मऱ्हाठी निःसंशय होती. तींत कांहीं ग्रंथही होते असतील. पण ते हल्लीं उपलब्ध तरी नाहींत. शालि० शकाच्या आठव्या शतकांत किंवा त्या सुमारास मालखेडचे जाधव नांवारूपास आले. ही मालखेडचे जाधवांची गादी बरीच वर्षे चालली व तिचा मऱ्हाठीमंडळावर अम्मलही बराच होता. पुढें कानडीमंडळाचा विक्रम चाळके हा राजा शालि० शकाच्या अकराव्या शतकाच्या आरंभीं मोठा पराक्रमी निपजला. बल्लाळानें मऱ्हाठीमंडळांत गादी स्थापिली, त्याच सुमारास कानडीमंडळांत द्वारवती मुक्कामींही एक जाधवांची गादी स्थापन झाली. द्वारवतीस अविंध इतिहासकार धुरसमुद्र ह्मणतात व कानडी लोक हलबीडु ह्मणतात. ही मोडलेली नगरी हल्लीं म्हैसुर प्रांतीं आहे. तेलंगणांतही वरंगुळ मुक्कामीं याच सुमारास एक जाधवांची गादी स्थापन झाली होती. देवगिरीकरांच्या वरंगुळकरांबरोबर व हलबीडुकरांबरोबर बऱ्याच लढाया झाल्या. त्यांच्या योगानें वरंगुळकर व हलबीडुकर हे उभयतां चांगले जेरीस आले होते, व देवगिरीकरांचा एकछत्री अंमल कुमारीपर्यंत बसण्याचा योग आला होता. पण एकाएकीं अविंध कोसळले तेव्हां एकसूत्री राज्याचा पाया मजबूत झालेला नव्हता.

तशांत वरंगुळकरांप्रमाणें हलबीडुकरांबरोबर लढाया मारून जरी फत्ते मिळविली तरी देवगिरीकर बरेच जर्जर होऊन गेल्यामुळें मऱ्हाठीमंडळामध्यें तकवा राहिला नाहीं व म्हणूनच देवगिरीची गादी विशेष प्रयास केल्याशिवाय आर्विधांस बुडवितां आली.

---

## २– देवगिरीची गादी आर्विधांनीं बुडविल्यानंतरची मऱ्हाठीमंडळाची स्थिति.

देवगिरीची गादी बुडाल्यानंतर लौकरच दिल्लींत एक गंगू नांवाचा ब्राह्मण होता त्याचा हुस्सेन नांवाचा एक गुलाम होता. या गुलामानें कलबुर्गें मुक्कामीं एक गादी स्थापिली. या गादीस गुलामशाही ह्मणतात. कांहीं वर्षांनीं गादी बेदर मुक्कामीं गेली. आपल्या जुन्या ग्रंथांत "बेदरचा बादशाह" बऱ्याच ठिकाणीं आढळतो. कांहीं वर्षांनीं बेदरची गादी बुडाली, व तिच्या ठिकाणीं तीन शाह्या स्थापन झाल्या. तेलंगणांत जी शाही स्थापन झाली, ती कुतुब नांवचा एक तुर्की गुलाम होता त्यानें स्थापन केली; ह्मणून तीस कुतुबशाही ह्मणतात. दुसऱ्या दोन शाह्यांचीं नांवें निझामशाही व अदिलशाही हीं होत. या दोन्हीं शाह्या मऱ्हाठीमंडळांत स्थापन झाल्या. निझामशाही अहमदनगर मुक्कामीं स्थापन झाली व अदिलशाही विजापुर मुक्कामीं स्थापन झाली.

गुलामशाहीचा मूळपुरुष हुस्सेन हा मोठा सज्जन होता. त्यानें गंगूस दिल्लीहून आपल्या राज्यांत आणिलें व संमानपूर्वक आपल्या खजिन्याचें काम पहाण्यास सांगितलें. या प्रमाणें हुस्सेन जरी मनाचा मोठा थोर होता ह्मणून हा

अविंध व हा मऱ्हाठा असा भेद मुळें केला नाहीं व त्यामुळें त्यानें मऱ्हाठ्यांस बाटविण्यासही यत्न केला नाहीं, तरी त्याच्या महंमदशहा नांवाच्या मुलानें अविंधांनीं हिंदुस्थानांत व इतरत्रही आरंभीं वळविलेला कित्ता वळविण्यास सुरवात केली. मऱ्हाठ्यांची देवळें व मूर्ती फोडून त्यांस बाटविण्यास महंमदशहानें आरंभ केला व महंमदशहाचा मुलगा मुजाहीद यानेंही तें काम जारीनें चालविलें. तरी लौकरच फिरोझ नांवाचा राजा झाला त्यानें सर्व धर्म देवाचे व देवापासून निघाले, असें उघड ह्मणून अविंधांप्रमाणें मऱ्हाठ्यांसही आश्रय देण्यास आरंभ केला. या काळीं दरोबस्त मऱ्हाठीमंडळ कांहीं अविंधांच्या स्वाधीन नव्हतें. कानडीमंडळांत विजयनगरची तेलंगी गादी स्थापन झाली होती. विजयनगरकरांबरोबर गुलामशाही राजांच्या लढाया हमेश होत. मऱ्हाठ्यांचाही थोडा बहुत त्रास त्यांस होतच असे. कोंकणांत मऱ्हाठे होते तें स्वतंत्र असत, व अविंधांस फारशी दाद देत नसत. अविंधांची सत्ता पुष्कळ वाढलेली असल्यामुळें जरी अखेरीस कोंकण त्यांस काबीज करितां आलें, तरी कोंकणांतील मऱ्हाठ्यांनीं मध्यंतरीं बरेच घाले घालून व कत्तली करून त्यांस जेरीस आणिलें, व त्यामुळें कोंकणांतील "मऱ्हाठे रणभूमीवर मोठे हट्टी व काटक" असा लेख अविंधांनीं लिहून ठेविला आहे. कोंकण सर झाल्यानंतर कांहीं मुलूख विजयनगरकरांच्या ताब्यांत होता, तो खेरीजकरून दरोबस्त मऱ्हाठीमंडळांत अविंधाई झाली, व लौकरच बेदरच्या पादशहातीचे तीन विभाग झाले.

निझामशाहीचा मूळपुरुष निझाम उल्मुल्ख हा मुळचा देशस्थ ब्राह्मण असून, वऱ्हाडांतील पाथ्री गांवचें कुळकरण याच्या पूर्वजांनीं केलेलें होतें. पुढें एका लढाईंत बेदरकरांनीं यास कैद करून बाटविलें. याच्या वंशजांनीं कोणत्याही प्रकारें मऱ्हाठ्यांस त्रास दिला नाहीं. उलट अनेक प्रसंगीं मऱ्हाठ्यांची बाजू घेऊन अविंधांबरोबरच त्यांनीं लढाया केल्या.

अदिलशाहीची स्थापना जरी एका तुर्कानें केली, तरी एका मऱ्हाठा सरदाराची बहीण बाटविलेली होती तिच्यावर याचें मन बसून तीस यानें आपली घरधनीण केलें. या मूळपुरुषाचें नांव यूसफ होय. यूसफाच्या बायकोचा धर्म जरी बदलला होता, तरी तिच्यामध्यें महाराष्ट्रपण पूर्णपणें वसत होतें. यूसफाच्या पाठीं त्याचा मुलगा गादीवर बसला. तो त्याच्या आतेनें वाढविलेला होता ह्मणून पुरा अविंध झाला होता. तरी त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा गादीवर बसला, तेव्हां यूसफच्या बायकोच्या हातीं सर्व सत्ता आली व दफ्तराची भाषा मऱ्हाठी झाली. पुढें अदिलशाहींतील अल्ली नांवाच्या एका सुलतानानें मात्र मऱ्हाठ्यांचा व त्यांच्या धर्माचा थोडा छळ केला. अल्ली अदिलशाहा, त्याकाळचा निझामशहा, व कुतुबशहा या तिघांनीं मिळून विजयनगरकरांस साफ बुडविलें. तरी त्याच्या पूर्वींच्या प्रमाणेंच पुढच्या अदिलशाही सुलतानांचें वर्तन त्या काळच्या इतर दुरभिमानी अविंधांनीं उदाहरण घेण्याजोगें होतें.

जितके ह्मणून अमुक पैगंबरावर किंवा अमुक ग्रंथां-

वर श्रद्धा ठेव[illegible] धर्म आहेत, तितके सर्व मूळचे परमताचे अगदीं असहिष्णु होत. असल्या धर्माचें एक जुनाट व दुसरें नंतरचें अशीं दोन रूपें असतात. ख्रिस्ती धर्म, अविंधी धर्म व ब्राह्मणी धर्म या तीन्हीं धर्मांचीं वर निर्दिष्ट केलेलीं दोन दोन रूपें आहेत. जुनाट रूप असतें, तें परमताचें अतिशय असहिष्णु असतें. त्यास दुसऱ्या मताचा वारा बिलकुल सोसत नाहीं. ख्रिस्ती धर्माचें जुनाट रूप क्याथोलिक मत होय. अविंधी धर्माचें जुनाट रूप सुन्नी असून, ब्राह्मणी धर्माचें जुनाट रूप कर्मठांच्या संप्रदायांत आपण पहातों. हीं जुनाट रूपें जिकडे जिकडे गेलीं तिकडे तिकडे त्यांनीं पूर्वीच्या भाषांचा व आचारविचारांचा उच्छेद करून त्यांच्या ऐवजीं सर्व कांहीं आपलेंच ठेवून देण्याचा दीर्घ यत्न चालविला. पण हा यत्न अखेरीस वायां जाऊन, प्रत्येक धर्मास आपलें जुनाट रूप सोडून द्यावें लागलें व इतरांच्या संसर्गानें प्राप्त झालेलें नवीन रूप पांघरावें लागलें. हें नंतरचें रूप ख्रिस्ती धर्माच्या प्राटेस्टंट मतांत व ब्राह्मणी धर्माच्या ब्रह्ममय सिद्धान्तांत आपणास आढळतें. अविंधांच्या धर्मास जें रूपांतर प्राप्त झालें तें शीया मत होय. शीया ह्मणविणारे लोक सुन्नी लोकांइतके परमताचे असहिष्णु नसतात. यूसफ अदिलशहा हा शीया मताचा होता. आरब व तुर्क हे सर्व सुन्नी असून, फारसी सर्व शीया होत. शीया मताचा प्रतिष्ठापक अल्ली हा त्यांच्या पैगंबराचा साक्षात् जांवई असून, त्याचें व त्याच्या मुलाचें आचरण सर्व प्रकारें उदाहरण घेण्यासारखें होतें.

हल्लींचे मोंगल, खोजे व बोहरे हे सर्व शीया पंथाचे आहेत.

याप्रमाणें जरी अविधांनीं बराच आश्रय मऱ्हाठ्यांस दिला तरी त्यांच्या भाषेस फारसा आश्रय मिळाला नाहीं, व मऱ्हाठी भाषा जवळ जवळ तीनशें वर्षें कुसत पडली होती.

---

## ३-शालि० शकाच्या सोळाव्या शतकाच्या आरंभीं मऱ्हाठ्यांमध्यें पुनः चळवळीस सुरवात होऊन दुसऱ्या उदयकाळास आरंभ झाला.

शालि० शके १२१२ या वर्षीं ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी रचिली. शालि० शके १२२० या वर्षीं किंवा या वर्षाच्या सुमारास देवगिरीची पहिल्यानेंच वाताहत झाली. शालि० शकाच्या पंधराव्या शतकाच्या शेवटच्या पादाच्या आरंभीं किंवा त्या सुमारास शालिवाहन वंशाची वसाहतपुरी व महाराष्ट्रमंडळाची जुनाट राजधानी पैठणनगरी ह्या मुक्कामीं एकनाथस्वामींनीं जन्म घेतला, व अद्वैत सिद्धान्ताचें अन्नसत्र सुरू केलें. ब्राह्मणी धर्माचें जें अतिसुंदर व सर्वसाधारण ब्रह्ममय रूप देवगिरीकरांच्या राज्यांत ज्ञानेश्वरादिकांचें सर्वस्व झालें होतें, त्याच रूपाचा एकनाथस्वामींनीं शके १५१२ या वर्षीं ज्ञानेश्वरीच्या प्रतींचा प्रसार करून जीर्णोद्धार केल्याचें श्रेय घेतलें. शके १५३० या वर्षीं तुकारामबोवा व रामदासस्वामी या दोहोंनीं जन्म घेतला व शके १५३१ या वर्षीं म्हणजे लागलेच दुसरे वर्षीं एकनाथस्वामी समाधिस्थ झाले. एकनाथस्वामीच्या

समाधिवर्षींच मुक्तेश्वर जन्मला. याच समयीं शहाजी भोंसले यानें केवळ स्वामिभक्तीनें निझामशाहीचा जीर्णोद्धार करण्यासाठीं भगीरथ यत्न करून आपलें नांव निझामशाहीच्या इतिहासांत अजरामर करून ठेविलें. शहाजी भोंसल्यासारख्या अस्सल मऱ्हाठ्यास निझामशाहीचा जीर्णोद्धार करण्याची उत्कट इच्छा झाली तीवरून निझामशाहीचे जे पुरुष झाले, त्यांनीं जातिभेद बिलकुल न राखतां आपल्या मूळपुरुषाच्या पूर्वाश्रमींच्या धर्मबांधवांस बराच आश्रय दिला असावा, असें निर्बाध अनुमान निघतें. जर अविंधपण निझामशाहींतील पुरुषांमध्यें वरचढ होतें, तर त्यांत महाराष्ट्रपण जिरून जातें व हिंदु मऱ्हाठ्यांकडेस त्यांचें मन ओढतेंना. पण महाराष्ट्रपणाचा जोर अधिक होऊन त्यांनीं थोर मनानें धर्मभेदाकडेस यत्किंचितही लक्ष न पोंचवितां आपल्या देशबांधवांस आश्रय दिला, त्याचें फळ शहाजीनें त्यांच्या शाहीचा जीर्णोद्धार करण्यासाठीं भगीरथ यत्न केले तेव्हां त्यांस मिळालें. मलिकंबर जातीचा अविंध होता, व त्याचा मुलगा फत्तेखान हाही जातीचा अविंध होता; पण त्यांनीं परकी मोंगलांचा पक्ष धरून आपल्याच निझामशाहीस समूळ बुडवावें व शहाजी मऱ्हाठ्यानें त्या निझामशाहीची पुनः प्रतिष्ठा करण्यासाठीं जिवावर सुद्धां उदार व्हावें!!! धन्य ती अविंधांची निझामशाही व धन्य तो शहाजी.

---

# पूर्वार्ध.

१–शिवाजीचा जन्म. २–जावळी काबीज करीपर्यंतची शिवाजीची संक्षिप्त हकीकत. ३–जावळी सर केली ती हकीकत. ४–शिवाजीची पितृभक्ति. ५–अवरंगझेब व शिवाजी. ६–शिवाजीचें प्रस्थ वाढतें व विजापुरकर अफझुलखानास शिवाजीवर पाठवितात. ७–अफझुलखानाच्या स्वारीची संक्षिप्त हकीकत. ८–अवरंगझेब आपला मावसा षाहिस्तेखान यास शिवाजीस बुडविण्यासाठीं दक्षिणची सुभेदारी देऊन पाठवितो. ९–अवरंगझेब मिर्झाराजा जयसिंग यास शिवाजीवर पाठविता. १०–दिलेलखान पुरंदरच्या किल्ल्यापुढें मुरार बाजीचा पराक्रम पाहून थक्क होतो. ११–जयसिंगाचा व शिवाजीचा तह होतो. १२–शिवाजी दिल्लीस जातो व मोठ्या युक्तीनें अवरंगझेबाच्या जबड्यांतून निसटून आपल्या मुलखीं सुरक्षित येतो. १३–शिवाजी तानाजी जवळून सिंहगड किल्ला घेववितो. १४–शिवाजी दुसरेही नांत्रास दिलेले किल्ले काबीज करितो. १५–पन्हाळगडास शिद्दी जोहर वेढा घालतो व शिवाजी वेढ्याची फळी फोडून बाहेर पडतो. १६–बाजी प्रभु फाझलला बाटेवर अडवितो व शिवाजी रांगण्यावर जाऊन पोंचतो. १७–शिवाजीचा व विजापुरकरांचा अखेरीस शहाजीच्या मार्फत तह होतो. १८–शिवाजीचा दिल्लीपतीबरोबर तंटा पुनः सुरू होतो. १९–साल्हेरीचा वेढा मऱ्हाठे मोठा पराक्रम करून उठवितात. २०–मऱ्हाठे मोंगलांच्या मुलखांत धुमाळी चालवितात. २१–विजापुरच्या दरबारीं दोन फळ्या होतात. २२–मऱ्हाठ्यांचा विजापुरकरांबरोबर पुनः झगडा चालतो. २३–जेसरीची लढाई व अबदुल करीमाचा पुरा मोड. २४–हंसाजीस लागलेंच सेनापतीचें पद शिवाजीकडून मिळतें. २५–प्रतापरावाच्या मरणानें शिवाजी फार कष्टी होतो. २६–हंबीरराव संपगांवची लढाई मारितात. २७–मुलूख चौतर्फा सुटूं लागतो व शिवाजी बिलकुल न डगमगतां सुटलेल्या मुलुखाची नीट व्यवस्था लावितो.

## १-शिवाजीचा जन्म.

निझामशाहीची पुनः प्रतिष्ठा करण्याच्या महाभानगडींत गुंग होऊन गेल्यामुळें, शहाजीनें आपली गरोदर नायका जिजाबाई हीस एका अडचणीच्या प्रसंगीं शिवनेरीच्या किल्ल्यांत ठेविलें. देवगिरीची गादी बुडाली, तेव्हां सहजच जाधवांच्या राजवंशास सरदारकी प्राप्त झाली. या पूर्वीच्या राजवंशी पण या काळीं सरदारकी प्राप्त झालेल्या कुळाची जिजाबाई ही कन्यका होय. शिवनेरी किल्ल्यांत जिजाबाई प्रसूत झाली, व मुलास तिनें शहाजीच्या आज्ञेनें शिवाजी हें नांव दिलें. शिवाजी महाराजांचा जन्म शालि० शके १५४९ प्रभवनाम संवत्सरे वैशाख शुद्ध द्वितीया, या दिवशीं झाला. एकनाथस्वामींनीं महाराष्ट्रमंडळांत धर्मसंबंधीं मोठी चळवळ करण्यास जसा याच शकांत आरंभ केला, तसा शिवाजी महाराजांनीं राज्यसंबंधीं मोठी चळवळ करण्यासही ह्याच शतकांत आरंभ केला; व अखेरीस अविंधांच्या जुलमांतून आपल्या देशबांधवांस, भाषाबांधवांस व धर्मबांधवांस मुक्त करून आणखीं एकदां मऱ्हाठी पादशहात स्थापिली. या शतकाच्या आरंभापासून मऱ्हाठीच्या व मऱ्हाठ्यांच्या दुसऱ्या उत्कर्षकाळास आरंभ झाला.

---

## २—जावळी काबीज करीपर्यंतची शिवाजीची संक्षिप्त हकीकत.

बारा वर्षांचें वय असतां शिवाजीस घेऊन जिजाबाई एकदां शहाजीस भेटावयास विजापुरीं गेली, कारण निझामशाही सफा बुडाल्यानंतर शहाजी विजापुरकरांच्या

पदरीं राहिला होता. विजापुराहून परत आल्या नंतर जिजाबाई पुणेंप्रांतीं राहूं लागली. शिवाजीनें मावळे लोकांमध्यें फिरण्याचा व आसपासच्या चोरवाटा लक्षांत ठेवण्याचा क्रम चालविला. या काळचे जे बाळ संवगडी शिवाजीचे होते, त्यांमध्यें तानाजी मालुसरे, सुरेराव कांकडे, बाजी फसलकर व येसजी कंक हे पुढें पुष्कळ नांवाजले. शिवाजी अठरा वर्षांचा झाला न झाला तोंच तोरणा किल्ला धनप्रयोगानें आपल्या ताब्यांत घेऊन राज्यस्थापनेच्या अनेकवार्षिक व क्लेशबहुल महासत्राची दीक्षा त्यानें घेतली. तोरणा किल्ला खणीत असतां शिवाजीस पुरलेलें द्रव्य सांपडलें, त्याचा त्यानें तेथून कोस सव्वा कोसावर मुरबाद नांवाच्या डोंगरावर एक मजबूत किल्ला बांधण्यांत सद्विनियोग केला. या किल्ल्यास राजगड असें नांव मिळालें. जवळ जवळ अभिषेक होईपर्यंत शिवाजीचें कायमचें ठाणें याच किल्ल्यांत असे. लौकरच चाकणचा हवालदार फिरंगोजी नर्साळा याचा देशाभिमान शिवाजीनें जागृत केला. तेव्हां किल्ला ताब्यांत दिला, इतकेंच नाहीं, तर आपण होऊन फिरंगोजीही शिवाजीचे पदरीं राहिला. नंतर सावत्र मामाचा देशाभिमान जागृत करण्यासाठीं शिवाजीनें पुष्कळ यत्न केला, पण तो सफळ झाला नाहीं. तेव्हां सावत्र मामास कैद करून कोणत्याही प्रकारें रक्तपात न करितां तंजावरप्रांतीं शहाजी होता त्याच्याकडेस शिवाजीनें पाठवून दिलें. तानाजीचाही देशाभिमान शिवाजीनें जागृत करून ठेविला होता. त्यामुळें तानाजीस मऱ्हाठीमंडळ व मऱ्हाठे यांच्या पलीकडेस दुसरें दिसत नसे.

कोंढाणा किल्ल्याचें राजकारण घेऊन तानाजी शिवाजीकडेस आला. शिवाजीनें कबूल केलेला ऐवज किल्लीदारास देऊन तानाजीसच तो किल्ला दिला, व मूळचें कोंढाणा किल्ला हें नांव बदलून तानाजीच्या पराक्रमाचें लाक्षणिक वर्णन करण्याच्या हेतूनें सिंहगड असें नांव ठेविलें. लौकरच पुरंदरचा ब्राह्मण किल्लीदार वारला, व त्याच्या मुलांमध्यें तंटा लागला. शिवाजीनें किल्ला आपल्या ताब्यांत घेऊन तीन्ही बंधूंस आपल्या पदरीं ठेविलें, व तंटा मिटविला. याप्रमाणें रक्ताचा एक थेंबही न पाडतां शिवाजीनें मऱ्हाठ्यांच्या पातशाहीची प्राणप्रतिष्ठा करण्यास आरंभ केला.

---

### ३ जावळी सर केली ती हकीकत.

रघुनाथपंत ह्मणून शहाजीचा एक वंशपरंपरागत कारकून होता, त्यानें जावळीच्या चंद्रराव मोऱ्यास वळविण्याचें काम आपल्या आंगावर घेतलें. संभाजी कावजी ह्मणून एक भीमाच्या बळाचा मऱ्हाठा क्षत्रिय होता, त्यास बरोबर घेऊन रघुनाथपंत जावळीस गेला. चंद्रराव मोरे रघुनाथपंताचें ऐकेना; व चंद्ररावाचा भाऊ चतुर्बेट मुकामीं होता, तोही ऐकेना. तेव्हां रघुनाथपंत व संभाजी कावजी या उभयतांनीं दोघां भावांचा खून करण्याची मसलत आपापसांमध्यें केली, व फौज घेऊन निसणीच्या घाटाजवळ तयार रहाण्यास शिवाजीस निरोप पाठविला. आजपर्यंत शिवाजीनें रक्तपाताशिवाय किल्ले काबीज केले होते. जावळी तशाच रीतीनें सर करण्याचा शिवाजीचा हेतु होता. अशा प्रसंगीं शिवाजी बरोबर फौज

आणी, ती किल्ला ताब्यांत घेऊन लागलाच बंदोबस्त करण्यासाठीं आणी. तेव्हां या प्रसंगीं नेहमींप्रमाणें शिवाजी नेमलेल्या दिवशीं व नेमलेल्या ठिकाणीं फौज घेऊन तयार राहिला. भावांचा खून झाला हें शिवाजीस समजण्याचा संभव एकदां घाट चढून वर गेल्यानंतर. पण वर गेल्यानंतर बंदोबस्त करण्याचें काम पहिलें होय. तें सोडून देऊन रघुनाथपंतासच पहिल्यानें शिक्षा करण्याचें काम निःसंशय रास्त नव्हतें. रघुनाथपंतानें खून केला त्यांत त्याचा कांहीं स्वार्थ नव्हता. तो केवळ त्यानें स्वामिकार्यासाठीं ह्मणून केला. तेव्हां वर चढतांच पहिल्यानें त्याच्या मुसक्या बांधण्याचें काम शिवाजीनें केलें नाहीं, त्यांत नवल नाहीं. तरी शिवाजीनें रघुनाथपंताचा निषेध पुढें निःसंशय केला असावा. जर या प्रसंगीं निषेध शिवाजीनें मुळींच केला नसता, तर रघुनाथपंत हाच क्रम पुढें चालविण्यास चुकला नसता, असें आम्हांस वाटतें. रघुनाथपंतास पुढें शिवाजीनें अधिक जोखिमाचा हुद्दा दिला नाहीं, त्याचें कारण या वेळचें त्याचें आचरण शिवाजीस पसंत पडलें नाहीं, हेंच असावें. शिवाजीनें अशा रीतीनें पुढें कधींही कोणाचा खून करविलेला नाहीं, त्यापक्षीं शिवाजीचें या खुनांत आंग असण्याचा बिलकुल संभव नाहीं. याच्या पूर्वीं जें शिवाजीनें काम केलें, तें तर रक्ताचा एक थेंबही पाडल्याशिवाय केलें. क्लैवनें बनावट सही केली ती काय त्याच्या वरिष्ठांनीं सांगितली ह्मणून केली? निःसंशय नव्हे. क्लैवनें बनावट सही केली, तीबद्दल त्याच्या वरिष्ठांनीं त्यास शिक्षा तरी केली काय? निःसंशय नाहीं. इतकेंच

नाहीं, तर उलट केलेल्या कामगिरीबद्दल क्लैवला "लार्ड" ही पदवी देऊन, त्याची सरकारानें बढती केली. शिवाजीनें रघुनाथपंताची कोणत्याही प्रकारें बढती तरी केली नाहीं. तेव्हां पुढें सुधारलेले ह्मणविणाऱ्या इंग्रज सरकारानें व लोकांनीं क्लैवच्या संबंधानें जें उदाहरण घालून दिलें त्याच्यापेक्षां कांहीं काळ त्यांच्या पूर्वीं होऊन गेलेल्या आमच्या शिवाजीनें उदाहरण घालून दिलें, तें निःसंशय अधिक शुद्ध होय. चंद्रराव मोऱ्यास दग्यानें मारल्याचा आरोप शिवाजीवर आंग्ल इतिहासकार आणितात. पण वर लिहिलेल्या मुद्यांवरून तो आह्मांस यथार्थ दिसत नाहीं.

---

## ४-शिवाजीची पितृभक्ति.

हा जो मऱ्हाठ्यांचा एक नवीन पातशहात स्थापन करण्याचा क्रम शिवाजीनें चालविला तो कांहीं शहाजीस विचारून किंवा त्याचें अनुमोदन घेऊन चालविलेला नव्हे. शहाजी असल्या क्रमास निःसंशय अनुमोदन न देता. आपल्या देशबांधवांचा, भाषाबांधवांचा व धर्मबांधवांचा उत्कर्ष प्रत्येक थोर पुरुषास हवा असतो. पण शक्याशक्याचा किंवा संभाव्यासंभाव्याचा विचार करून थोर पुरुषाची प्रायः प्रवृत्ति होते. तेव्हां महाराष्ट्रमंडळाचा उत्कर्ष जरी कोणत्याही प्रकारें शहाजीस अनिष्ट नव्हता, तरी शिवाजीच्या असल्या क्रमापासून अविंधांच्या पादशहातीस धक्का पोंचून मऱ्हाठी पादशहातीचा पाया पडणें, हें त्यास केवळ अशक्य भासतें व तो कधींही अनुमोदन देता ना. पुढें शहाजी तंजावर प्रांत काबीज क-

रून तिकडेच राहूं लागला, तेव्हांपासून तर शिवाजीचा व त्याचा व्यवहार जवळ जवळ तुटला, असें ह्मटल्यास साजेल. शिवाजीच्या या कृत्यास शहाजीची आंतून फूस असेल, अशी विजापुरकरांस शंका येणें साहजिक होतें. पण त्यांनीं शहाजीस दगा करून कैद करावें असा बाजी घोरपड्यास आंतून हुकूम पाठविला, तें मात्र चांगलें काम केलें नाहीं. बाजीनें जेवायास बोलावून शहाजीस एकदम कैद केलें व विजापुरीं पाठविलें; व विजापुरकरांनीं शहाजीस आंधार कोठडींत ठेविलें. ही बातमी शिवाजीस कळली, तेव्हां त्यानें दिल्लीपति आज्ञा करील ती कामगिरी बजाविण्याचें पतकरलें. शिवाजी आपल्या पदरीं राहिला असें पाहून शहाजहानानें विजापुरकरांस पत्र लिहिलें, व शहाजीची कैदेंतून मुक्तता केली. ज्या बाजीनें वर लिहिलेल्या प्रकारचा दगा केला, त्याचें पारिपत्य पुढें एकाएकीं छापा घालून व त्याची जहागीर जाळून शिवाजीनें यथायोग्य केलें. याप्रमाणें पितृऋणांतून मुक्त होऊन शिवाजीनें आपली लोकोत्तर पितृभक्ति दाखविली.

---

## ९–अवरंगझेब व शिवाजी.

या काळीं दिल्लीचा पातशहा शहाजहान असून, त्यानें दक्षिणची सुभेदारी आपला अगदीं धाकटा मुलगा अवरंगझेब यास सांगितली होती. अवरंगझेब हा मोठा कावेबाज व आपमतलबी राजपुत्र होता. अवरंगझेब मूर्तिमंत स्वार्थ असून, शिवाजी हा मूर्तिमंत परार्थ होता. शिवाजी जें कांहीं करी ते मऱ्हाठ्यांची उन्नति व्हावी म्हणून करी. अ-

वरंगझेब बाहेरून आविंधांच्या धर्माची उन्नति करण्यास झटतों, असें दाखवी खरें ; पण विचारा अंतीं त्यास एक आत्मोन्नति हवी होती. आत्मोन्नतीखेरीज त्यास दुसरें कांहीं बिलकुल नको होतें. जर खरोखरीच धर्मोन्नति अवरंगझेबास हवी असती तर स्वधर्माच्या कुतुबशाहीस व अदिलशाहीस न बुडवितां, त्यांच्या मदतीनें तो शिवाजी व मऱ्हाठे या दोहोंचीं मुळें पहिल्यानें खणून काढता. पण तसें न करितां कुतुबशाही बुडवून लागलीच अदिलशाही बुडविली व पुढें मऱ्हाठ्यांस बुडविण्यास अवरंगझेबानें यत्न केला. या जगद्विदित ऐतिहासिक गोष्टीवरून अवरंगझेबास धर्मोन्नतीपेक्षां आत्मोन्नतिच अधिक हवी होती, हें निर्विवाद सिद्ध होतें. ज्या पुरुषाचा एकदां संबंध जडला त्यास पुरतेपणीं ओळखण्याचा गुण शिवाजीमध्यें पूर्णपणें वसत होता. बाप म्हातारा झाला आहे तेव्हां लौकरच तख्तासाठीं बंधूंबरोबर भांडण्याचा प्रसंग येईल, व त्या प्रसंगीं शिवाजीसारख्या शूर व छातीच्या पुरुषाचा मोठा उपयोग होईल, या मतलबानें अवरंगझेबानें शिवाजिबरोबर स्नेह ठेविला. देश, भाषा व धर्म या त्रयीची ऐकान्तिक व आत्यंतिक सेवा करण्याचें जें आपण महाव्रत पत्करलें आहे, तें चालविण्याच्या कामीं बराच उपयोग अवरंगझेबाचा होईल, अशी अटकळ करून शिवाजीनेंही अवरंगझेबाबरोबर विशेष घरोबा ठेविला. विजापुरकर हे दिल्लीस दर वर्षीं कांहीं खंडणी पाठवीत असत, तेव्हां ते दिल्लीच्या तख्ताचे ताबेदार झाले; अशा समजुतीनें शिवाजीनें अवरंगझेबाजवळ त्यांच्या कोंकणामधील बऱ्याच प्रदेशांतील अव्यवस्था मोडू-

न व्यवस्था करण्यासाठीं म्हणून परवानगी मागितली. जर धर्माभिमान अवरंगझेबामध्यें यत्किंचित् तरी असता तर अविंधांच्या मुलखांतील अव्यवस्था मोडून व्यवस्था लाविण्याची परवानगी त्यानें शिवाजीसारख्या स्वधर्मद्राह्य पुरुषास कधींही दिली नसती. जर अविंधांवर कोणी परकी जाईल, तर त्यास अविंधानें बिलकुल मदत करितां कामां नये, असा अविंधांच्या मौलवींनीं महासिद्धान्त करून ठेविला आहे. या स्थळीं अविंधांचा मुलूख बळकाविण्यास एका अविंधाजवळ शिवाजी परवानगी मागतो व अविंधी धर्माचा मोठा अभिमान बाळगतों अशी लौकरच पुढें आढ्यता मिरविणारा तो पुरुष शिवाजीस ती देतो. सारांश, या काळीं व या काळाच्या पुढें अवरंगझेबासारख्या कपटी व कावेबाज पुरुषासही शिवाजीस ओळखणें झालें नाहीं. पण शिवाजीनें अवरंगझेबासारख्यासही पुरें ओळखून ठेविलें. इतकी शिवाजीच्या आंगीं धूर्तता होती. जर विजापुरकरांनीं शहाजीस गांजलें नसतें, तर शिवाजी दिल्लीपतीच्या बाजूस इतका वळता ना. पण आपल्या बापाचा विनाकारण छळ केल्यामुळें, नाइलाज होऊन शिवाजीस दिल्लीपतीचा आश्रय करावा लागला.

---

## ९-शिवाजीचें प्रस्थ वाढतें व विजापुरकर अफझुलखानास शिवाजीवर पाठवितात.

अवरंगझेबाबरोबर शिवाजीनें स्नेह ठेविण्यास आरंभ केला, त्यावेळीं वर कल्याण भिवंडी पर्यंत शिवाजीच्या मुलखाची हद्द लागली होती. कल्याणच्या सुभेदारानें विजापुरास खजिना पाठविला होता, तो निळो सोनदेव

ऊर्फ आबाजी सोनदेव यानें छापा घालून लुटला; इतकेंच नाहीं, तर सुभेदाराची खुबसुरत ह्मणून नांवाजलेली एक सून होती, ती निळोपंताच्या हातीं लागली, व ती निळोपंतानें शिवाजीसाठीं ह्मणून राखून ठेविली. पण शिवाजीनें अवतार घेतला तो विषयोपभोगासाठीं घेतलेला नव्हेच. चंदनाप्रमाणें आपल्या देहास झिजवून प्राणव्ययानेंही आपल्या त्रयीचें कल्याण करण्याचा शिवाजीचा कृतसंकल्प होता. शिवाजीच्या लग्नाच्या चार बायका होत्या. पण परस्त्रीवर मन गेलें व परस्त्री आणून शिवाजीनें राखेप्रमाणें आपल्या घरांत बसविली किंवा आपल्या जवळच्यास किंवा पदरच्यास तसें करूं दिलें, असें ह्मणण्यास बिलकुल आधार नाहीं. जेव्हां निळोपंतानें सुभेदाराच्या सुनेस शिवाजीपुढें आणून ठेविलें, तेव्हां आमची आई जर अशी खुपसुरत असती तर आह्मींही खुबसुरत झालों असतों, अशा मतलबाचा गंभीर उद्गार काढून तीस व तिच्या बरोबर कैद केलेल्या दरोबस्त लहान मोठ्या अविंधांस यथायोग्य सत्कारपूर्वक शिवाजीनें विजापुरीं पाठवून दिलें. स्त्रीवर कधींही शिवाजीनें किंवा शिवाजीच्या पदरच्यानें हात टाकलेला नाहीं. कैदी सांपडतील त्यांची कत्तल करण्यास किंवा त्यांचा कोणत्याही प्रकारें अपमान किंवा उपमर्द करण्यास शिवाजीनें कधींही मरेपर्यंत हुकूम केला नाहीं. या दरोबस्त गोष्टींचा महाराष्ट्रमात्रानें मोठा अभिमान बाळगण्याजोगा आहे.

याप्रमाणें कल्याणप्रांत खालसा केला, इतकेंच नाहीं, तर रायरी वगैरे हबशाच्या मुलखांतील किल्ले ताब्यांत

घेऊन शिवाजी मजबूत करीत चालला व प्रतापगडासा रखे नवीन किल्लेही बांधीत चालला, ही बातमी ऐकून विजापुरचें दरबार पुष्कळ अस्वस्थ झालें. लौकरच अहमदनगर व जुन्नर हीं दोन मोंगलांचीं ठाणीं मारून पेंठा लुटल्या, तरी अवरंगझेबाकडून शिवाजीस पारिपत्य करण्यांत आलें नाहीं. तेव्हां अवरंगझेबाची फूस मिळून शिवाजी अशी पुंडाई करितो, अशी विजापुरकरांस शंका आली. या काळीं विजापुरीं सर्व घोंटाळा चालला होता. महंमद अदिलशहाचा मुरारपंत नांवाचा वझीर होता. हा ब्राह्मण पुढें शाहूच्या कारकीर्दींत नांवाजलेल्या बाळाजी विश्वनाथाप्रमाणेंच मोठा इमानी व विश्वासू होता. पण महंमद अदिलशाहा वारल्या नंतर हा परधर्मी ह्मणून यास मारेकऱ्यांकडून मारविलें व एका अविंधास वझीरत देऊन, मुलगा अज्ञी लहान होता ह्मणून महंमद अदिलशहाच्या बायकोनें कुलूकारभार आपल्या हातीं घेतला. पण जें इमान परधर्मी ब्राह्मणांत होतें, तें स्वधर्मी वझीरांत कारभारीण बाईस सांपडलें नाहीं. जेव्हां अवरंगझेबानें लौकरच विजापुरावर स्वारी केली, तेव्हां अविंध वझीर फितूर झाला; व केवळ आपल्या पोळीवर तूप वाढून घेऊन, विजापुरच्या सुलतानतीचें पुष्कळ नुकसान होईल, असा अवरंगझेबाबरोबर त्यानें तह केला. सारांश, कारभारीण बाईमध्यें तारतम्याचा अंश बराच कमी होता.

कारभारीणबाईनें आपल्या उमरावांस बोलावून आणिलें, व शिवाजीस ठार मारण्याचें किंवा कैद करून आणण्याचें कोण पत्करतो ह्मणून विचारिलें. जमलेल्या उमरावांपैकीं शिवाजीस पकडून आणण्याची किंवा त्याचें डोकें तरी कापून आणण्याची प्रतिज्ञा एका अफझुलखानानें केली.



---

## ७--अफझुलखानाच्या स्वारीची संक्षिप्त हकीकत.

पांच हजार स्वार व सात हजार प्यादे मिळून बारा हजार लश्कर घेऊन अफझुलखान निघाला. शिवाय उंटें, तोफा, बाण वगैरे सर सामान बरोबर होतेंच. गोपीनाथपंत नांवाचा ब्राम्हण कारकूनही बरोबर होता. वाटेंत अफझुलखानानें तुळजापुरीं मुक्काम केला, व भवानीचा जात्यांत घालून भरडा केला. गोपीनाथपंतासारख्या ब्राह्मणास बरोबर घेऊन, अनेक ब्राह्मणांचें कुळदैवत होऊन बसलेल्या देवीस असल्या प्रकारचा उपद्रव केला, हें कांहीं अफझुलखानानें शहाणपणाचें काम केलें नाहीं. असली अफझुलखानाची कंटाळवाणी कृति पाहून जर गोपीनाथपंतानें प्रसंगीं सूड घेण्याचा मनांत संकल्प केला तर त्यांत फारसें आश्चर्य मानण्याजोगें नाहीं. धर्माच्या संबंधानें दुसऱ्यास सत्तेच्या जोरावर आज चिडवणें, यासारखें चिडविणारावर प्रसंग आल्यास परिणामीं घातक काम दुसरें नाहीं. दुर्बळ असतो त्यास आपला दुर्बळपणा माहीत असतो. त्यामुळें बळीचा कान लागलाच उपटून देण्याचें त्याच्या हातून होत नाहीं. तरी त्याचें गाऱ्हाणें देवाकडेस जातें, व देवाच्या घरीं सर्व धर्म सारखे असल्यामुळें, अन्यायानें चालणारास अखे-

रीस कोणाच्या तरी हातून पारिपत्य मिळाल्याशिवाय रहात नाहीं. पुढें भीमातीरावरून अफझुलखानानें कृष्णातीरीं मुक्काम केला, व गोपीनाथपंतासच हेजिबी करिण्यास शिवाजीकडेस पाठविलें.

जर अफझुलखानाचा लढाईच देण्याचा मानस असता तर हेजिबीसाठीं ह्मणून त्यानें गोपीनाथपंतास शिवाजीकडेस पाठविलें नसतें. अफझुलखान येतो ही बातमी राजगडीं कळतांच शिवाजीनें लढाईची तयारी केली, व नित्याप्रमाणें शिवाजी जिजाबाईच्या पायीं डोकी ठेवून जावळीजवळ लढाई देण्याच्या बेतानें प्रतापगडीं आला. पण अफझुल मोठा कावेबाज होता. अफझुल शरीरानें मोठा धिप्पाड होता इतकेंच नाहीं, तर बळही त्याचें अचाट होतें. शिवाजी हा वामनमूर्ति असून आपलें अचाट बळ त्याच्या आंगीं नाहीं, हें अफझुलास नीट माहीत होतें. कारभारीणबाईच्यापुढें अफझुलानें प्रतिज्ञा केली होती ती शिवाजीस पकडून आणण्याची किंवा त्याचें डोकें कापून आणण्याची केली होती. लढाईनें प्रतिज्ञा पूर्ण होण्याचा संभव बिलकूल नव्हता. क्षणभर कल्पना केली कीं अफझुलाची लढाईंत फत्ते झाली, तरी शिवाजी प्रसंगीं पळाला असता. मग अफझुलाची प्रतिज्ञा पूर्ण होणार कशी? ती प्रतिज्ञा पूर्ण करण्यास अफझुलास दग्याशिवाय दुसरें साधन बिलकुल नव्हतें. अशा प्रकारचा दगा करून या काळीं विजापुरच्या दर्बारीं बऱ्याच उमरावांनीं हिंदूप्रमाणें आपल्या अनिंध प्रतिस्पर्ध्यांचेही प्राण घेतले होते. इतकेंच नाहीं, तर एका प्रकारचा दगा करून शिवाजीचा वडील बंधु संभाजी यास या

अफझुलखानानेंच प्राणास मुकविलें होतें. तेव्हां पूर्वींच्या इतिहासावरून, त्या काळच्या लोकांच्या संप्रदायावरून, केलेल्या प्रतिज्ञेवरून, दोहोंच्या शरीरसंपत्तींची तुलना करितां व हेजिबी करण्याकरितां आपण होऊन पंतास पाठविलें या मुद्यावरून, अफझुलखान आला तो दग्याच्याच उद्देशानें आलेला होय; तो कांहीं लढाईच्या उद्देशानें आलेला नव्हे. शिवाजीच्या कानीं तो दग्याच्या उद्देशानें आला, ही गुणगुण आली होती. पण तींत तथ्य कितपत आहे, तें नीट शिवाजीस कळलें नव्हतें. गोपीनाथपंताबरोबर बोलणें चालविण्यास आपला हेजीब कृष्णाजीपंत यास शिवाजीनें पाठविलें. कृष्णाजी म्हणा किंवा शिवाजी म्हणा-पण या दोहोंपैकीं कोणाकडून तरी गोपीनाथाचा देशाभिमान जागरूक करण्यांत आला व कोणत्या उद्देशानें अफझुलखान आला होता, तें रहस्य गोपीनाथानें शिवाजीस कळविलें. तेव्हां अफझुलास भेटायास जाण्याचे वेळीं शिवाजी विशेष बंदोबस्तानें गेला व प्रसंग पडल्यास आपली फौजही तयार करून ठेविली, त्यांत कांहीं आश्चर्य मानण्यासारखें नाहीं.

अफझुल पहिल्यानें जावळीस जाण्यास कबूल होईना व शिवाजीनें आपल्या गोटांत त्यानें यावें असा आग्रह धरिला. जें काम अफझुलास करणें होतें तें परक्याच्या जागेंत जड जाणार होतें. पण पुढें शिवाजीचा आपल्या गोटांत न येण्याचा दृढ निश्चय पाहून आपलें चतुरंग दळ घेतलें व शिवाजीची जावळी मुक्कामीं भेट घेण्याचा त्यानें ठराव केला. जर अफझुलाच्या मनांत दगा नसता तर चतुरंग दळ बरोबर घेण्याचें कांहीं प्रयोजन

नव्हतें. ही गोष्ट शिवाजीच्याही लक्षांत आली. अफझुलखान भेटीस येणार तो सय्यद बंडा नांवाचा एक पट्टा खेळण्यांत अति कुशळ आवंध होता, त्यास बरोबर घेऊन येणार, ही बातमी शिवाजीस कळली. तेव्हां भेटीस जातांना शिवाजीनें आपल्या आंगांत "जिराची कुडती घातली. डोईस मंदिल बांधिला त्यांत तोडा बांधिला, पायांत चोळणा घालून कास कसली; व हातांत एक बिचवा व वाघनख चढविलें;" व वर रिवाजाप्रमाणें पोशाख घातला. पुढें जिऊ महाला व संभाजी कावजी या दोन हत्यारबंद हुजऱ्यांस बरोबर घेऊन शिवाजी अफझुलखानाच्या भेटीस गेला. अफझुलानें शिवाजीस संशय येऊं नये ह्मणून आंगांत एक झगा मात्र घातला होता, व हातांत एक जमदाड ठेऊन सय्यद बंड्यास पाठीं थोड्याशा अंतरावर ठेविलें होतें. भेट होतांच अफझुलखानानें शिवाजीस घट्ट मिठी मारली व शिवाजीची "मुंडी कांखेखालीं कंवटाळून धरिली व हातीं जमदाड होती तिचें मेण टाकून ती शिवाजीचे कुशींत चालविली ती आंगांत जिरेची कुडती होती, तीवर खरखरली, आंगास लागली नाहीं." हें पाहून शिवाजीनें डाव्या हातांतल्या वाघनखानें जोरानें वार करून खानाची चरबी बाहेर काढिली व उजव्या हातांतल्या बिचव्यानें दुसरा वार करून लागलाच पाय काढिला. अफझुलखानानें "मारलें मारलें" अशी बोंब पाडिली. लागलेंच अफझुलास भोयांनीं पालखींत घातलें. भोई निघतात, इतक्यांत संभाजी कावजीनें वार करून भोयांस खालीं पाडिलें; व अफझुलाचें डोकें कापून तें घेऊन संभाजी शिवाजीस मी-

झाला. तों सय्यद बंडा पुढें सरसावला. इतक्यांत जिऊ महाल्यानें पुढें होऊन सय्यदाचा हात हत्यारासहित तोडला. शिवाजीनें लागलेंच प्रतापगडावर जाऊन इशारतीची तोफ मारिली, ती ऐकतांच सेनापति नेताजी पालकर व मोरोपंत पेशवे यांनीं आंत शिरून पठाणांची दाणादाण करून सोडली. तुळजापुरच्या भवानीचा भरडा केला त्याचें त्या दिवसापासून बरोबर एकविसावे दिवशीं प्रतापगडच्या भवानीच्या पायीं शिरकमळ पडून अफझुलखानास नीट प्रायश्चित्त मिळालें. शालि० शके १५८१ विकारी नाम संवत्सरे मार्गशीर्ष शुद्ध ९ शुक्रवार, या दिवशीं अफझुलखानाचें डोकें कापलें जाऊन, तें प्रतापगडच्या भवानीच्या पदकमळावर वाहिलें गेलें.

शिवाजीनें गोपीनाथपंतास आपणाकडे वळविण्यांत किंवा गोपीनाथपंतानें शिवाजीकडे वळण्यांत कांहीं गैर केलेलं आह्मांस दिसत नाहीं. गोपीनाथ शुद्ध पैशाच्या लोभानें वळला, असें ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. देशाभिमान शिवाजीनें जागृत केला ह्मणून गोपीनाथपंत वळला. शिवाजीस विजापुरकर बंडखोर समजत. बंडखोरापासून मिळणाऱ्या बक्षिसापेक्षां सुलतानाकडून मिळणाऱ्या बक्षिसाची मातबरी व स्थायिकपणा अधिक, हा साधा व सुबोध मुद्दा गोपीनाथपंतासारख्या मुत्सद्दी पुरुषास कोणींही सांगण्याची गरज नव्हती. शिवाजीस पकडून अफझुलखानाच्या स्वाधीन करिता, ह्मणजे गोपीनाथपंताचें उखळ पांढरें होतें. तेव्हां रहस्य फोडून शिवाजीकडेस वळणें हें हातांतलें सोडून पळत्याच्या पाठीं लागण्यासारखें आलें. देशाभिमान

किंवा कोणत्याही प्रकारचा सदभिमान जागरूक झाल्याशिवाय तूर्त फायद्यावर लाथ मारणें कोणाही पुरुषाच्या हातून होणें नाहीं. स्वार्थ व देशार्थ किंवा धर्मार्थ यांचा जेव्हां विरोध येतो तेव्हां स्वार्थास सोडून देऊन देशार्थाकडे किंवा धर्मार्थाकडे वळणें हें खऱ्या मोठेपणाचें एक लक्षण आम्ही समजतों. तेव्हां गोपीनाथपंत शिवाजीकडे वळला तो त्याचा देशाभिमान जागृत झाल्यामुळें स्वार्थावर लाथ मारून देशार्थ संपादण्यासाठीं म्हणून वळला. शिवाजीसही या संबधानें दोष देणें बरोबर नाहीं. देशाभिमान जागृत करून स्वार्थत्याग करविणें व परार्थाकडेस थोडें तरी लक्ष दुसऱ्याचें पोंचेल असें करणें, हें एका प्रकारचें शहाणपण होय. हें शिवाजीचें शहाणपण इंग्रज लोकांच्या अगदीं वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्यें होतें, म्हणून विग्रह सुरू होतांच जाहीरनामा लावून त्यांस पेशव्याचीं व शिंद्याचीं इंग्रज व दुसऱ्या पाश्चात्य लोकांच्या शिकवणुकींत असलेलीं पलटणें व त्यांचे अधिकारी यांस फितवितां आलें; व अशा रीतीनें फितवा झाल्यामुळें वेलेसली व लेक यांस विशेष प्रयास न करितां पेशव्याच्या व शिंद्याच्या फौजांवर जय मिळून कंपनीसरकारास पुष्कळ फायदा झाला. तेव्हां शिवाजीस या संबधानें बोल लाविण्यांत अर्थ नाहीं. शिवाजीनें दगा करून अफझुलखानास मारलें, असा आंग्ल लोकांनीं लिहिलेल्या इतिहासांत लेख येतो, तो केवळ एकतर्फी असून चुकीचा होय. आपल्या लोकांच्या दरोबस्त प्राचीन लेखांत अफझुलखान मोठा दगलबाज असून दग्यानें शिवाजीचें डोकें कापून नेण्याच्या किंवा शिवाजीस पकडून नेण्याच्या उद्देशानें

आला होता असें स्पष्ट लिहिलेलें असतें; व तें तसेंच असण्याचा संभव विशेष आहे, असें वरील उपपत्तीवरून ठरतें. शिवाजीमध्यें शेरास सव्वाशेर न मिळता, तर अफझुलखानाची इष्टसिद्धि होती.. पण शेरास सव्वाशेर मिळाल्यामुळें अफझुलखानासच ठोकर लागली, व जेव्हां शिवाजीनें पुनः जिजाबाईच्या पायांवर डोकी ठेविली तेव्हां "शिवबा, तूं संभाजीचें उसनें फेडलेंस" असा उद्गार तिच्या तोंडून निघाला.

---

## ८—अवरंगझेब आपला मावसा षाहिस्तेखान यास शिवाजीस बुडविण्यासाठीं दक्षिणची सुभेदारी देऊन पाठवितो.

सुभेदारी सोडून दिल्लीस गेल्यापासून तख्ताच्या खटपटींत पडल्यामुळें अवरंगझेबास शिवाजीकडेस लक्ष देण्यास फुरसत सांपडली नाहीं. पुढें अफझुलखानास बुडविलें ही बातमी जेव्हां अवरंगझेबास कळली तेव्हां शिवाजी जोरावला, अशी त्याची खात्री झाली व त्यानें आपला मावसा षाहिस्तेखान यास सुभेदारी देऊन दक्षिणेंत पाठविलें.

षाहिस्तेखानानें दक्षिणेंत येऊन लागलीच चाकणच्या किल्ल्यास वेढा दिला. फिरंगोजी नरसाळा यानें किल्ला चांगला लढविला. पण सामग्री सरून गेली तेव्हां किल्ला घेऊन आपणास व आपल्या ठाण्यास शिवाजीकडेस जाण्याची परवानगी मिळावी ह्मणून फिरंगोजीनें षाहिस्तेखानाजवळ बोलणें लाविलें. षाहिस्तेखान बा-

दशाहाच्या पदरीं ठेवून फिरंगोजीस एकदम नांवाजण्यास तयार झाला. पण परकीय बादशहाच्या पदरीं राहून नित्य तूप पोळी झोडण्यापेक्षां शिवाजीसारख्या स्वकीय पुरुषाच्या पदरची रोजची कोरडी भाकर फिरंगोजीस अधिक आवडली, व अर्थातच बादशाहाच्या पदरीं रहाण्याचें त्यानें नाकारलें. स्वदेशभक्त असावे तर फिरंगोजीसारखे असावे. फिरंगोजीसारखे जे निःसीम स्वदेशभक्त पुरुष या काळीं होऊन गेले, त्यांचा प्रत्येक महाराष्ट्रानें अभिमान बाळगण्यासारखा आहे. असले स्वदेशभक्त पुरुष बरेच जन्मल्याशिवाय कोणत्याही देशाचा किंवा लोकांचा उदय होणें नाहीं. फिरंगोजीची वाहवा करून त्याचा मनोरथ पूर्ण केला, त्यावरून षाहिस्तेही मनाचा निःसंशय थोर होता.

चाकणचा किल्ला घेतल्यानंतर षाहिस्तेखान पुण्यास येऊन राहिला व तेथून त्यानें शिवाजीचा मुलूख ओसाड करण्यास नामदारखानास पाठविलें. मुलखास जाळून ओसाड करून व प्रजेस लुटून फन्ना करून लोकांस जेरीस आणण्याची शक्कल कांहीं मुळची शिवाजीची नव्हे. ही युक्ति मुळची जिंगिसखानाच्या मोंगलांची. तिमूरलंगानें आपलें नांव आशियाभर व युरोपभर गाजविलें, तें याच युक्तीचा आश्रय करून गाजविलें. या दोन जगद्विदित पूर्वजांनीं घातलेला कित्ता, आपल्या धन्याचें नांव व राज्य कायम रहावें म्हणून शहाजीनें भगीरथ प्रयत्न केले ते न आवडल्यामुळें त्याचा प्रांत व त्यास आश्रय दिला म्हणून विजापुरकरांचा प्रांत ओसाड व उद्ध्वस्त करण्यासाठीं खान झमान व खान डौरान यांस हुकूम देऊन, शहाजहानानें

चांगला वळविला. तेव्हां मोंगलांनीं घालून दिलेल्या पद्धतीचा जर क्वचित् शिवाजीनें कार्यमहत्त्वामुळें आदर केला, तर त्यास त्याबद्दल दोष देणें वाजवी नाहीं.

एके रात्रीं मोरोपंताबरोबर शिलेदार व मावळे १००० व नेताजीबरोबर १००० बारगीर देऊन त्यांस दुतर्फा पाहिस्तेखानाच्या गोटा बाहेर अर्ध कोसावर शिवाजीनें उभें रहाण्यास सांगितलें; व कांहीं करणेकरी व मशाल्ये इशारत मिळतांच करणे वाजविण्यास व मशाली पेटविण्यास हुकूम देऊन वाटेवर ठेविले. नंतर खेडकर बंधू कुळकरणी कायस्थ जातीचे होते त्यांस व आणखीं दहा पंधरा लोकांस आपल्याबरोबर घेऊन, शिवाजी—लग्न चाललें होतें त्यांत मिळून ह्मणा किंवा आपण पहाऱ्याचे लोक असें ह्मणून ह्मणा—पाहिस्तेच्या गोटांत शिरला. ज्या वाड्यांत पाहिस्तेखान रहात होता त्यांतच शिवाजीचें बाळपण गेल्यामुळें त्यांतील दरोबस्त कोने कोपरे त्यास माहीत होते, ह्मणून शिवाजीस एकदम वाड्यांत शिरतां आलें. कांहीं हत्यारबंद लोक जागृत होते ते आंगावर आले त्यांस बरोबर गेलेल्यां एका कुळकरण्यानें ठार केलें. कांहीं दासी पडलेलीं शस्त्रें घेऊन शिवाजीच्या लोकांच्या आंगावर आल्या, त्याही ठार झाल्या. दुसऱ्या दासी व बायका होत्या त्यांच्या केंसासही धक्का लागला नाहीं; कारण अनाथ व अशस्त्र बायकांवर हात न टाकण्या विषयीं शिवाजीचा सक्त हुकूम असे. पाहिस्तेखानाची या धामधुमींत तीन बोटें गेलीं व त्याचा मुलगा अबू फत्ते ठार झाला. नंतर शिवाजी, दोघे कायस्थ व बरोबर आलेले दुसरे लोक निघाले, ते लागलेच त्या गोंधळांत

करणे वाजवीत मशाली पेटवून बाहेर पडले. यांचे करणे ऐकून व मशाला पाहून गोटाच्या बाहेर लोक ठेविले होते, त्यांनींही करणे वाजविले व मशाली पेटविल्या. करण्यांचा शब्द ऐकून व मशालीचा उजेड पाहून शिवाजीचें लश्कर पुष्कळ बरोबर आलें असावें, अशी धास्ती पडली, व मोंगल मऱ्हाठ्यांचा पाठलाग करण्यास धजला नाहीं. त्यामुळें शिवाजी बरोबरचें एकही मनुष्य जांया होऊं न देतां अर्ध्या कोसावर प्रसंग पडल्यास तयार ठेविलेल्या लश्करांत येऊन मिळाला. या आदल्या रात्रीं पूर्णपणें सिद्धीस गेलेल्या नाटकी नकलेमुळें दुसरे दिवशीं षाहिस्तेखानाची इतकी पांचावर धारण बसली कीं लौकरच तो दिल्लीस परत गेला. शहाजहानाचे हुकुमानें शहाजीचा नेटानें पूर्वी पाठलाग करून जें कर्ज दिलें होतें, तें पितृभक्त शिवाजीनें या वर्षी षाहिस्तेखानास लढाईशिवाय परत घालवून सव्याज फेडून टाकिलें.

---

## ९—अवरंगजेब मिर्झा राजा जयसिंग यास शिवाजीवर पाठवितो.

पुढें शिवाजीस साफ चिरडून टाकण्याचा बेत करून अवरंगझेबानें मिर्झा राजा जयसिंग यास दक्षिणची सुभेदारी दिली, व त्याच्या हाताखालीं दिलेलखान नांवाचा पठाण होता त्यास दुय्यम नेमून, शिवाजीस बुडविल्यानंतर विजापुरकरांस बुडवून टाकण्याचा हुकूम फर्माविला. पूर्वी आवरंगझेब दक्षिणचा सुभेदार असतां अहमदनगर पेंठ मारली होती तेव्हां शिवाजीची पागा

जेमतेम १२०० असून शिलेदार ५००० होते. अफझुलखानास बुडविल्यानंतर पागा ह्मणजे बारगीर ७००० व शिलेदार ८००० मिळून १५००० स्वार, व मावळे लोकांची संचणी १२००० मिळून, सगळी फौज २७००० होती. या २७००० फौजेपैकीं बरीच फौज किल्ले सांभाळण्यांत व मुलखाचा बंदोबस्त राखण्यांत लागली असावी. शिवाजी बरोबर तह करून मिर्झा राजा विजापुराकडेस वळला, तेव्हां त्याच्याजवळ स्वार व पायदळ मिळून १६००० फौज होती. या फौजेंत कांहीं शिवाजीचें स्वार व पायदळ होते. तेव्हां जवळ जवळ ५०००० फौज घेऊन जयसिंग दक्षिणेंत उतरला. असल्या जंगी फौजेपुढें शिवाजीचा तो काय टिकाव लागणार? शिवाजीची छाती कांहीं कमी धाडसाची होती असें नाहीं. पण शिवाजी जितका धाडशी होता, तितकाच दूरदृष्टि होता. नुसत्या धाडसानें मऱ्हाठेशाहीच्या प्राणप्रतिष्ठेसारखीं अचाट कामें होत नसतात. प्रसंगीं धाडस तर हवेंच, पण दूरदृष्टिपणा धाडसाप्रमाणें पुष्कळ असला पाहिजे. सारांश, शिवाजीमध्यें योगदर्शित्वाचा गुण कांहीं विलक्षण होता. ह्मणून दिल्लीपतीबरोबर तह करण्याचा मोठ्या शहाणपणाचा विचार शिवाजीनें या प्रसंगीं केला.

---

## १०–दिलेलखान पुरंदरच्या किल्ल्यापुढें मुरार बाजीचा पराक्रम पाहून थक्क होतो.

मिर्झा राजा जयसिंग याच्या हाताखालीं जो दिलेलखान

नांवाचा एक शूर पठाण सरदार होता, त्यास आपल्या व आपल्या बरोबरच्या पठाणांच्या शौर्याची घमेंड फार होती. पांच हजार निवडक पठाण, बऱ्याच तोफा व पुष्कळ आडहत्यारी लोक घेऊन पुरंदरच्या किल्ल्याच्या पुढें दिलेलखान आला, व डोक्यावरची पगडी उतरून "गड घेईन तेव्हां पगडी बांधीन" असा त्यानें निश्चय केला. पुरंदरचा हवालदार मुरार बाजी नांवाचा एक कायस्थ होता. त्याच्या जवळचे १००० लोक व किल्ल्यावरील १००० लोक, मिळून २००० लोक दिलेलखानाच्या लोकांचा समाचार घेण्यास तयार होते. या २००० लोकांपैकीं ७०० निवड करून आपणाबरोबर घेतले, व लागलेच मुरारराव दिलेलखानावर व त्याच्या पठाणांवर चालून गेले. तेव्हां मऱ्हाठ्यांचें व पठाणांचें भांडण लागलें, तें मोठ्या निकराचें भांडण लागलें. ५०० पठाण ठार झाले, व फक्त ६० शूर मऱ्हाठे बरोबर घेऊन मुरारराव थेट दिलेलखानाच्या देवडीपर्यंत गेले. मऱ्हाठ्यांचा हा निकराचा हल्ला पाहून दिलेलखान कचला, व किंचित पाठीं हटून तिरंदाज वगैरे १००० लोकांस ६० मऱ्हाठ्यांवर मारा करण्यास त्यानें हुकूम फर्माविला. साठ मऱ्हाठे अखेरीस पडले, ते अनेक पठाणांस भाजीप्रमाणें चिरून व पृथ्वीस दणाणवून पडले. तरी मुरारराव एकटे पळभरही विसांवा न खातां ढाल व फिरंग घेऊन पुढें पाऊल टाकीत चालले. लौकरच दिलेलाची गांठ पडली. दिलेलखान लागलाच नांवाजून मुराररावांस बादशहाच्या पदरीं ठेविण्यास तयार झाला. पण धन्य त्या कायस्थाची! शिवाजीचा व आपल्या जन्मभूमीचा द्रोह करून अशाश्वत वैषयि-

क सुखाचा अभिलाष करणें त्याच्यापेक्षां यावच्चंद्रदिवाकर पाठीमागें आपलें नांव निष्कलंक ठेवून स्वामिभक्तीचें व भूमिभक्तीचें आपल्या सजातीयांस उदाहरण घालून देणें हें त्यास विशेष श्रेयस्कर वाटलें; व दिलेल अशा प्रकारचे राजद्रोहाचे व भूमिद्रोहाचे शब्द काढितो ह्मणून रोषानें त्याच्यावरच वार करण्यास चालला, तों दिलेलखानानें कमान घेऊन व तीर मारून त्यास वीरांची गति दिली. मुराररावांबरोबर ७०० लोक गेले त्यांपैकीं या स्मरणीय व संकीर्तनीय दिवशीं ३०० ठार झाले, व ४०० परत सुखरूप किल्ल्यावर गेले. दिलेलखानाचे जवळ जवळ १५०० लोक पडले. तेव्हां शिवाजीच्या व जन्मभूमीच्या या निःसीम भक्ताचें शौर्य व त्यानें आपल्या देशबंधूस घातलेलें सदुदाहरण पाहून दिलेलखानानें घटिकाभर तोंडांत बोट घालून आश्चर्य केलें, त्यांत आश्चर्य तें कोणतें? महाराष्ट्र मंडळांतील लोकांमध्यें—जसे ब्राह्मणांमध्यें तसे ब्राह्मणेतरांमध्यें—प्रसंगीं हट्ट, काटकपणा व आवेश किती असतात, तें उदाहरणतः पहाणें असल्यास, या काळच्या मऱ्हाठ्यांच्या इतिहासाचा चित्रपट पहावा, ह्मणजे सर्व नीट दिसून येईल.

---

## ११- जयसिंगाचा व शिवाजीचा तह होतो.

मुरारराव तीनशें मऱ्हाठ्यांस बरोबर घेऊन वीरगतीस गेले, ही बातमी लौकरच शिवाजीस कळली. तीनशें मऱ्हाठ्यांनीं “पठाणें” व “मोंगलें” मिळून १५०० लोक कापले, ही वार्ताही लौकरच जयसिंगाच्या कानीं पडली. शिवाजीस तह करणें इष्ट होतें, कारण या काळीं दिल्ली-

पतीबरोबर बरींच वर्षें चांगली टक्कर मारतां येई इतकी फौज त्याच्याजवळ जमलेली नव्हती. जयसिंगासही तह करणें इष्ट होतें, कारण पुढें विजापुरकरांवर स्वारी करण्याचा त्यास हुकुम होता. तशांत मऱ्हाठ्यांस विशेष चिडविल्यास कांहीं फायदा न होतां उलट पुष्कळ तोटा होण्याची मोठी धास्ती पुरंदरप्रकरणावरून पडली. तेव्हां पंचवीस किंवा सत्तावीस किल्ले देऊन शिवाजीनें दिल्लीपतीच्या पदरीं रहावें व शिवाजीस किल्ल्यांच्या मोबदला विजापुरकरांचा जो मुलुख पुढें काबीज होईल त्या मुलुखाची चौथ व सरदेशमुखी या दोन हक्कांच्या सनदा मिळाव्या, अशा करारानें जयसिंग व शिवाजी या उभयतांचा तह झाला.

---

## १२– शिवाजी दिल्लीस जातो व मोठ्या युक्तीनें अवरंगझेबाच्या जबडयांतून निसटून आपल्या मुलखीं सुरक्षित येतो.

तह झाल्यानंतर जयसिंगानें विजापुरकरांवर स्वारी केली. या स्वारींत शिवाजीच्या मावळ्यांमुळें व पागेमुळें जयसिंगास बरेच ठिकाणीं यश आलें. तेव्हां जयसिंगानें शिवाजीची पुष्कळ तारीफ करून बादशहास पत्रें लिहिलीं, व बादशहानें शिवाजीस दिल्लीस बोलाविलें. १००० मावळे व ३००० स्वार बरोबर घेऊन शिवाजीची स्वारी दिल्लीस निघाली. अवरंगाबादेस शिवाजी पोंचला तेव्हां ५०० स्वार व ५०० पायदळ त्यास सामोरें आले. एक लाख रुपये शिवाजीस अवरंगाबादच्या तिजो-

रीतून द्यावे, असा बादशहाचा फिर्मान आला होता. फिर्मानावरहुकुम रुपये मिळतांच अवरंगाबादेहून शिवाजी निघाला. दिल्लीस येऊन पोंचल्यावर शिवाजीनें जयसिंगाचा मुलगा रामसिंग दर्बारीं होता, त्याची पहिल्यानें भेट घेतली. बापानें पत्रद्वारा कळविल्याप्रमाणें रामसिंगानें शिवाजीची तरतूद ठेविली होती. पुढें दर्बारीं शिवाजी आला, तेव्हां शिवाजीस जसवंतसिंग ह्मणून रजपूत राजा होता त्याच्या खालीं जागा दिली. हा अपमान वाटून रामसिंगाचें व शिवाजीचें थोडें आपापसांत दर्बारांतच बोलणें झालें. अवरंगझेबानें गुणगुण काय चालली आहे ह्मणून विचारिलें, तेव्हां रामसिंगानें कांहीं हांशिलाचें नाहीं, असा जबाब दिला. पण अवरंगझेब पहिल्या प्रतीचा संशयी होता; त्यास संशय येऊन शिवाजीस नजर कैदेंत ठेवण्यास लागलाच हुकुम झाला. कांहीं दिवसांनीं आपणास व आपल्या लोकांस दिल्लीची हवा मानत नाहीं, सबब स्वदेशीं जाण्यास परवानगी द्यावी, असा शिवाजीनें अर्ज केला. चार हजार लोक बरोबर आले होते, त्यांस स्वदेशीं जाण्यास बादशहानें रजा दिली. पण नगरचा कोतवाल फोलादखान यास ५००० लोकांनिशीं शिवाजीच्या आसपास खबरदारीनें राहण्यास सांगून, शिवाजीस दिल्लींत कोंडून टाकिलें याप्रमाणें शिवाजी अवरंगझेबाचे हातीं आयता लागला.

शिवाजीवर हा खरोखरीच मोठा आणीबाणीचा प्रसंग गुदरला. पण प्रसंग कसाही गुदरला, तरी त्यांतून बाहेर पडण्याची शिवाजीस बुद्धि सुचे. पहारेकऱ्यांस गोड बोलून व खिराल देऊन शिवाजीनें इतके वश केले कीं ते सकाळीं व संध्याकाळीं मिळून दोनदां मात्र शि-

वाजीकडेस येत, व सारा दिवस व सारी रात्र ते शिवाजीस पाहिजे तसें करूं देत. शिवाजीनें मोठे पेटारे भरून उमरावांकडेस त्यांतून नझराण्यादाखल "मेवा भरून एका पेटाऱ्यास दोघे मजूर लावून व मध्यें लांकूड घालून पाठविण्याचा रोज राबता लाविला." पेटारे कोणाचे वगैरे चौकशी चौकीच्या लोकांनीं एकदां दोनदां केली. मेवा भरून उमरावांकडेस जात आहे असें मजुरांनीं सांगितलें, तेव्हां पेटारे उघडून पाहिले तों आंत खरोखरीच मेवा आणि दुसरें कांहीं नाहीं—तेव्हां चौकीचे लोकांची खात्री झाली. असें कांहीं दिवस चाललें. तेव्हां चौकीचे लोक विशेष डोळा ठेवीतनासे झाले. नंतर प्रसंग पाहून पांच सात कारकून व हुजरे जवळ राहिले होते—त्यांस पेटाऱ्यांत घालून शिवाजीनें पळविलें. एके दिवशीं संध्याकाळीं शिवाजी व संभाजी आपण खुद्द पेटाऱ्यांत बसले व दिल्लीच्या बाहेर पडले. नंतर संभाजीस एका घोडक्यावर बसविलें, व आपण त्याचा घोडेवाला बनून शिवाजीनें मथुरेचा रस्ता धरिला.

इकडे निघण्याच्या पूर्वीं शिवाजीनें आपल्या पलंगावर हिरोजी फरजंद नांवाचा एक विश्वासू हुजऱ्या होता त्यास निजवून आपला स्वतःचा शेला त्याच्यावर अशा रीतीनें घातला कीं सर्व शरीरावर पांघरूण पडून एक हातमात्र उघडा राहिला; व नंतर एका पोऱ्यास रस्त्यावरून आणून त्यास हा शिवाजी निजला आहे, असें सांगून त्याचे पाय रगडायास लाविलें. शिवाजीनें पोबारा केल्यानंतर सारी रात्र हा पोऱ्या पाय रगडीत राहिला. सकाळीं चौकीचे लोक आले आणि खोलींत येऊन पहा-

तात, तों पोर पाय रगडीत आहे व शेल्याच्या बाहेर एक हात मात्र आला आहे. पोरास विचारिलें, तेव्हां शिवाजीचें डोकें दुखतें असा त्यानें जबाब दिला. याप्रमाणें तीन प्रहर दिवस होईपर्यंत हिरोजी निजला. प्रहर दिवस राहिला असें पाहून हिरोजी उठला व पोरास घेऊन बाहेर जाऊं लागला. तेव्हां चौकीदारांनीं शिवाजीची तबियत कशी आहे, ह्मणून विचारिलें. "महाराजांचें डोकें फार दुखतें तर कृपा करून मी औषध घेऊन येईपर्यंत आंत कोणास जाऊं देऊं नका—" अशी विनंती चौकीदारांस करून, हिरोजीनें पोराची बिदागी केली. रामसिंगास भेटून त्यास हिरोजीनें इत्थंभूत हकीकत कळविली व लागलाच आपणही कूच केला. दुसरे दिवशीं सकाळीं पहारेकरी येऊन पहातात तों शिवाजी नाहीं, हिरोजी नाहीं व पोरही नसून पलंग रिकामा पडलेला!!! पहारेकऱ्यांनीं ही बातमी लागलीच फोलादखानास कळविली. फोलादखान लागलाच बादशहाकडेस गेला. अवरंगझेबानें दवंडी पिटवून सांपडेल तिकडून शिवाजीस पकडून आणण्याविषयीं सर्वांस सक्त ताकीद केली. पण शिवाजी एकदां निसटला तो पुनः अवरंगझेबाच्या हातीं लागला नाहीं.

शिवाजीनें मथुरेस येऊन संभाजीस मोरोपंत पेशव्यांचे मेहुणे त्रिवर्ग बंधू तेथें रहात होते त्यांच्या जवळ ठेविलें, व त्यांस सर्व कर्तव्य सांगून आपण पहिल्यानें मोठी तिरस्थळी यात्रा केली. नंतर जगन्नाथाची यात्रा करून, गोंडवणांतून भागानगरावरून व विजापुरावरून शिवाजीची स्वारी सुखरूप राजगडास येऊन पोंचली.

---

## १३-शिवाजी तानाजीजवळून सिंहगड किल्ला घेववितो.

परत आल्यानंतर शिवाजी कांहीं स्वस्थ बसला नाहीं. तांब्यास दिलेले किल्ले पुनः सर करण्याचा निश्चय करून तो त्यानें मोरोपंत पेशवे, आबाजी सोनदेव, अण्णाजी दत्तो, निताजी पालकर वगैरे आपल्या पदरच्या विश्वासू कारकुनांस कळविला. तानाजी मालुसरा बाळसंवगडी यास जवळ बोलावून सिंहगड किल्ला कसा घ्यावा, ती मसलत विचारिली. सिंहगडावर १२०० शूर रजपूत असून, किल्लेदार उदेभान शौर्यासाठीं फारच नांवाजलेला होता. पण आपल्या मावळ्यांवर तानाजीचा इतका भरंवसा होता कीं या १२०० रजपुतांबरोबर टक्कर मारण्यास त्यास ५०० मावळे पुष्कळ वाटले. आपला बंधु सूर्याजी व ५०० मावळे इतके लोक बरोबर घेऊन सिंहगडासारखा बिकट व मजबूत किल्ला सर करण्याचें तानाजीनें पत्करलें.

सुर्याजीस व पांचशें मावळ्यांस बरोबर घेऊन तानाजी रात्रीं गडाखालीं आला. दोन मर्दाने मावळे पाहून त्यांस पहिल्यानें गडाच्या कड्यावर चढविलें. ते वानराप्रमाणें एका क्षणांत कड्यावरून गडावर गेले. नंतर त्यांनीं ३०० मावळे व तानाजी इतक्यांस वर घेतलें. इतक्यांत चौकीदारास कांहीं संशय येऊन त्यानें उदेभानास लागलीच वर्दी दिली. उदेभानानें उठून लागलेच गोलंदाज, बरकंदाज वगैरे आपले लोक तयार केले, व मऱ्हाठ्यांवर चाल केली. "हरहर महादेव" असा सिंहनाद मोठ्यानें करून मऱ्हाठे

पुढून हल्ला करूं लागले व पाठीमागून आपल्या लोकांस वर घेऊं लागले. तीन तास तुंबळ युद्ध झालें. पांचशें रजपूत ठार झाले, व चाळीस पन्नास मावळे पडले. तानाजी व उदेभान एकमेकांवर वार करूं लागले. उदेभान तर तानाजीच्या वारानें पडलाच, पण त्याच्या वारानें तानाजीही पडला. तेव्हां मऱ्हाठ्यांनीं थोडा कच खाल्ला. पण सुर्याजी नुक्ताच वर आला तो एकदम पुढें सरसावला व "तुमच्या तानाजीचें प्रेत टाकून तुम्ही कोठें पळून जातां" अशा अर्थाचा उद्गार त्यानें काढिला. हे शब्द कानीं पडतांच मावळ्यांस पुनः दम आला व सुर्याजीबरोबर त्यांनीं लागलेंच पाऊल पुढें टाकिलें. मऱ्हाठ्यांनीं इतक्या निकरानें रजपुतांवर हल्ला केला कीं वीस पंचवीस रजपूत जे कड्यावरून भयानें उड्या टाकून मेले, त्यांस सोडून जे रजपूत वर राहिले ते मऱ्हाठ्यांनीं दरोबस्त कापून काढिले. नंतर सिंहगड सर झाला, ही सुवार्ता शिवाजीस कळण्यासाठीं संकेताप्रमाणें सुर्याजीनें एका झोंपड्यास आग लाविली. तो उजेड शिवाजीनें राजगडाहून पाहिला, तेव्हां त्यास मोठा आनंद झाला.

दुसरे दिवशीं जासुदानें येऊन तानाजी पडला, ही बातमी शिवाजीस कळविली. तेव्हां अत्यंत कष्टी होऊन शिवाजीनें "एक गड घेतला, पण एक गड गेला," असा उद्गार काढिला.

---

## १४-शिवाजी दुसरेही तांब्यास दिलेले किल्ले काबीज करितो.

याप्रमाणें मालुसरे बंधूंनीं प्रत्येक मऱ्हाठ्यानें ध्यानांत

ठेऊन अभिमान बाळगण्याजोग्या वीरश्रीचें उदाहरण घातलें व सिंहगड घेतला. माहुली किल्ला घेतला, तेव्हां त्याचा हवालदार अलिवर्दीखान प्राणास मुकला. कल्याण भिंवडीवर हल्ला केला, त्यांतही तेथील ठाणेदार उझबकखान ठार झाला. याप्रमाणें मोरोपंत व आबाजी सोनदेव, शिवाजीच्या मावळ्यांचा काटकपणा व धाडस हीं दोन्हीं मोंगलांस, पठाणांस व रजपुतांस दाखवीत असतां, नितांजी पालकर विजापुरकरांच्या मुलुखास उपद्रव करीत होता, व अण्णाजी दत्तो पन्हाळा घेण्याच्या खटपटींत होता. शिवाजीनेंही सुरत लुटून शहाअलम व जसवंतसिंग यांच्या बरोबर सलुख्याचें बोलणें चालविलें होतें. शिवाजी पोबारा करून गेल्यानंतर, जयसिंग विजापुराहून दिल्लीस परत येत असतां वाटेवरच वारला. तेव्हां दिलेलखानास परत बोलावून अवरंगानें दक्षिणची सुभेदारी आपला वडील मुलगा शहाअलम यास सांगितली होती व त्याच्या हाताखालीं जसवंतसिंगास नेमिलें होतें. शहाअलम महा मनाचा थोर व दिलाचा उदार राजपुत्र होता. अवरंगझेबानें शहाअलमास दक्षिणची सुभेदारी देऊन पाठविलें, तेव्हां शिवाजीबरोबर चांगला सलूख ठेवून शिवाजीचा विश्वास आपणांवर बसे, अशाच प्रकारचें वर्तन ठेविण्यास सांगितलें होतें. त्याप्रमाणेंच वर्तन शहाअलमानें शिवाजीबरोबर ठेविलें होतें. इतक्यांत भेद करून पन्हाळा किल्ला अण्णाजी दत्तोनें घेतला, व त्यामुळें तिकडेस शिवाजी वळला. नंतर शिवाजीनें खेळणा किल्ला घेऊन त्याचें नांव विशाळगड ठेविलें, व रांगणा किल्लाही घेतला.

---

## १५-पन्हाळगडास शिद्दी जोहर वेढा घालितो व शिवाजी वेढ्याची फळी फोडून बाहेर पडतो.

पन्हाळगडीं शिवाजी असतां २०००० स्वार घेऊन शिद्दी जोहर विजापुराहून पन्हाळगड घेण्यास आला. शिद्दी जोहराबरोबर बापाचा सूड घेण्यासाठीं अफझुल-खानाचा मुलगा फाझल हाही आला होता. पन्हाळ-गडास वेढा पडला त्याच्या पूर्वीं नेताजीस प्रसंगीं तयार रहाण्यास शिवाजीनें सांगितलें होतें. पण नेताजी समयास येऊन पोंहोचला नाहीं, व कालक्षेप करीत बसल्यास मोंगल घोटाळा करून टाकतील, असा विचार करून एके रात्रीं गडकऱ्यांस बरोबर घेतलें व वेढा घालणाऱ्या लश्कराची फळी फोडून शिवाजी रांगण्याकडेस निघाला. तेव्हां शिद्दी जोहरानें शिवाजीचा पाठलाग करून, त्यास साफ बुडविण्यास फाझलला सांगितलें.

---

## १६-बाजी प्रभु फाझलला वाटेवर अडवितो व शिवाजी रांगण्यावर जाऊन पोंचतो.

रांगणा दोन चार कोसांवर राहिला इतक्यांत फाझल आपणास गांठतो असें पाहून, शिवाजीनें चार पांच हजार मावळे जवळ दिले व बाजी प्रभु यास आपण रांगण्यावरून तोफेची इशारत करीपर्यंत फाझल व त्याची फौज या उभयतांस थोपून धरण्यास सांगितलें.

हा व पुरंदरावरील मुरार बाजी, हीं एकाच काय-स्थरूपी खाणींतलि माणकें होत. दहा हजार फौज घेऊन फाझल निघाला, व पहातो तों बाजी वाटेवर आड आला आहे. मावळ्यांनी गोळ्यांचा असा मार चालविला कीं

फाझलास व त्याचे फौजेस खिंडींत पुढें ह्मणून पाऊल टा-
कितां येईना. इतक्यांत दोन हजार लोक घेऊन बा-
जी प्रभु पुढें सरसावला व प्रसंगीं मदत करण्यास ह्मणून
बाकीच्या लोकांस पाठीं ठेविलें. बाजीनें व मावळ्यांनीं
इतक्या हट्टानें व नेटानें भांडण चालविलें कीं फाझलचे
पांच हजार लोक पडले, पण इतक्यांत दुर्दैवानें मर्मस्थानीं
बाजीसच गोळा लागला. तरी बाजी बराच वेळ तळम-
ळत लोकांस धीर देत होता, व त्यामुळें झगडा मोठ्या
नेटानें चालला होता. इतक्यांत शिवाजी रांगण्यावर
पोंचला व संकेताप्रमाणें इशारतीची त्यानें तोफ मारिवली.
ती कानीं पडतांच बाजी कृतकृत्य झाला व मऱ्हाठे हटत
नाहींत, असें पाहून फाझलनेंही पाऊल मागें काढिलें.
याप्रमाणें मऱ्हाठ्यांस पुरें यश आलें व आपला प्रभु कि-
ल्ल्यावर पोंचला, ह्या दोन सुवार्ता कानीं पडल्या, तेव्हांच
बाजीनें गोळा काढायास सांगितलें. या दोन सुवार्ता
कानीं पडतपर्यंत जरी पुष्कळ वेदना होत होत्या, तरी
बाजीनें त्यांच्याकडेस बिलकुल लक्ष न पोंचवितां मोठ्या
धीरानें आपल्या लोकांस धीर देण्याचें काम चालविलें
होतें!!! गोळा काढितांच या वीराचे प्राणोत्क्रमण झालें.
प्रसंगीं बाजीसारखीं वीररत्नें महाराष्ट्रमातेच्या उदरीं जन्म-
तात, ही गोष्ट प्रत्येक महाराष्ट्रानें अभिमान बाळगण्याजोगी
आहे. महाराष्ट्रमाते, धन्य तुझी कीं बाजीसारख्या पुत्र-
रत्नांनीं तूं आजपर्यंत अनेक वेळां पुत्रवती झालीस. या-
प्रमाणें फाझलला निराश होऊन हात हालवीत पाठीं
जावें लागलें, व शिद्दी जोहरानें पन्हाळगडाचा वेढा लागलाच
उठविला.

## १७-शिवाजीचा व विजापुरकरांचा अखेरीस शहाजीच्या मार्फत तह होतो.

अवरंगझेबानें शिवाजीचा पुरा विश्वासघात करण्याच्या मतलबानें शिवाजीबरोबर मैत्री वाढविण्यास व शिवाजीच्या मुलास जहागीर देण्यास शहाअलम यास फिर्मान लिहिला होता. त्या फिर्मानाअन्वयें शहाजाद्यानें संभाजीस एक सातहजारी देऊन १५ लक्षांची जहागीर वऱ्हाडांत दिली. तेव्हां शिवाजीनें ५००० स्वार बरोबर देऊन प्रतापराव व निराजीपंत यांनिशीं संभाजीस अवरंगाबादेस पाठविलें. पन्हाळगडाहून आल्यानंतर "समयास पावला नाहींस" असा बोल लावून शिवाजीनें नितोजीची सर्नोबती लागलीच घेतली व ती नितोजीची पागेची सर्नोबती राजगडचा कडतोजी गुजर नांवाचा सर्नोबत होता, त्यास प्रतापराव असें नांव देऊन सांगितली. लौकरच वर लिहिल्याप्रमाणें प्रतापरावाची निराजीपंताबरोबर अवरंगबादेस योजना झाली. पांच हजार स्वारांपैकीं २५०० संभाजीजवळ राहिले व २५०० जहागिरींत गेले. कांहीं दिवसांनीं संभाजी सध्या बालक आहे, या निमित्तानें शिवाजीनें त्यास आपणाजवळ आणविलें.

याप्रमाणें मोंगलांची धास्ती बिलकुल न राहिल्यामुळें शिवाजीस आपलें सगळे लक्ष विजापुरकरांकडेस लाविण्यास सांपडलें. अली अदिलशहानें खासा स्वारी करून पन्हाळा घेतला, व अबदुल करीम नांवाच्या पठाण सरदारानें रांगण्यास वेढा घातला. पण शिवाजीनें रांगण्याचा वेढा उठविला. इतक्यांत कित्येक पाळेगारांनीं

वंडें केलीं तीं मोडण्यासाठीं अली आदिलशहास कर्नाटकीं जाणें प्राप्त झालें. पुढें अलीनें विचार केला कीं मोंगलांची आपणास धास्ती आहेच व शिवाजीचेंही पारडें इतकें वाढलें आहे कीं मोंगलांनीं देखील त्याच्या बरोबर तह केला; तेंव्हां शहाजीच्या मार्फत तह केला म्हणजे मोंगलांबरोबर झुंजण्याचा प्रसंग आल्यास शिवाजीचा पुष्कळ उपयोग होईल. असा खरोखरीच शहाणपणाचा विचार करून शहाजीस विजापुरच्या दर्बारानें शिवाजीकडेस तह करण्यासाठीं जाण्यास सांगितलें. आपल्या पराक्रमी पुत्रास भेटण्याची शहाजीस इच्छा होणें हें स्वाभाविक आहे. आंधारकोठडींतून दिल्लीपतीचा हुकूम आणून सोडविलें, इतकेंच नाहीं, तर दगा करणाऱ्या बाजी घोरपड्यास सवड सांपडतांच समूळ बुडविलें; च पूर्वीं पाठलाग करून हैराण करणाऱ्या षाहिस्तेखानास बोटें कापून आपल्या जहागिरींतून पळवून लाविलें. इतकीं मोठीं कामें ज्या मुलानें केलीं त्यास एकदा तरी पहाण्याची इच्छा बापास होणें हें साहजिक होय. विजापुरकरांच्या राहिलेल्या मुलुखास शिवाजीनें उपद्रव देऊं नये व शिवाजीनें हा काळपर्यंत घेतल्या मुलुखास विजापुरकरांकडून उपद्रव होणार नाहीं, असा तह केला व पुष्कळ पैसा व चिजा सुलतानास नजर करण्यासाठीं म्हणून घेऊन शहाजी निघाला. परत आपल्या मुलखीं आल्यानंतर थोड्याच दिवसांनीं एका जमीनदारास पारिपत्य करण्यासाठीं म्हणून शहाजी गेला, तो बेंगरुळाजवळ शिकार करीत असतां घोड्यावरून पडून शालि० शके १५८९ च्या सुमारास वारला.

## १८-शिवाजीचा दिल्लीपती बरोबर तंटा पुनः सुरू होतो.

विजापुरकरांबरोबर तह झाला, तेव्हां शिवाजीस कांहीं विसांवा मिळेल, अशी आशा होती. पण इतक्यात एक राजकारण झाल्यामुळें, शिवाजीचा व मोंगलांचा पुनः तंटा जुंपला. दिल्लीस जातानां एक लाख रुपये शिवाजीस अवरंगाबादेच्या तिजोरींतून मिळाले होते, ते संभाजीच्या जाहागिरींतून सुफीखानानें कापून घेतले. ही बातमी कळली, तेव्हां शिवाजी फार चिडला. अवरंगझेबाकडेस दाद तर मिळण्याचा संभव नाहीं. तेव्हां शिवाजीनें कापलेल्या एक लाख रुपयांबद्दल जहागीर लुटून यावयास सांगितलें. हुकुमाप्रमाणें जहागिरीची लूट घेऊन प्रतापराव व निराजीपंत शिवाजीस येऊन मिळाले.

प्रतापराव आल्यानंतर शिवाजीनें तिसऱ्यानें सुरत लुटली. या वेळेस शिवाजीच्या बरोबर १०००० पागा व १०००० शिलेदार असून पांच सात हजार मावळे व जवळ जवळ सगळें मोरोपंत प्रभृति कारकूनमंडळ होतें. दोन दिवस अहोरात्र शहर लुटलें. शिवाजी सावकारांस व व्यापाऱ्यांस मात्र लुटी. या दोन वर्गांतील लोकांस सोडून, दुसऱ्या कोणाच्याही केंसासुद्धां शिवाजीच्या लुटींत धक्का लागत नसे. शहर लुटून गोळा केलेल्या मालानें मोठ्या मोठ्या थैल्या भरल्या व त्या १०००० स्वारांवर व मावळ्यांवर लादल्या, व १०००० स्वार राहिले ते प्रसंग पडल्यास शिवाजीनें झुंजण्यासाठीं तयार ठेविले. अशी व्यवस्था करून शिवाजी

लागलाच सुरतेहून निघाला. ही बातमी ऐकून, शहाअलमनें दाऊदखान पुन्हे यास शिवाजीवर पाठविलें. दाऊद चांदोरास येऊन पाहतो तों पुढें शिवाजीचे स्वार अडविण्यासाठीं ह्मणून आलेल्या बकीखानास नामोहोरम करून व किल्ल्यांत लपून राहण्यास भाग पाडून शिवाजीनें नाशिकचा रस्ता धरिला. दाऊद मोठ्या धांदलीनें रातोरात निघाला व आघाडीस अखलखानास ठेविलें. सकाळीं एका टेंकडीवरून मऱ्हाठे जात आहेत, असें पाहून लागलाच अखलासानें हल्ला केला. पण अखलासाचा मोड होऊन त्यास एक जखमही लागली. दाऊद येऊन पहातो तों अखलासखान जायां होऊन पडला आहे. तेव्हां रायमुकुंद व भवान पुरोहित यांस पुढें पाठवून, राहिलेलें लश्कर घेऊन दाऊद स्वतः पाठून निघाला. रायमुकुंद व भवान पुरोहित यांनीं गोळा चालविला, तेव्हां कांहीं मऱ्हाठे पडले खरे तरी बादशाही लोकच पुष्कळ जायां झाले. इतक्यांत दाऊद येऊन पोंचला. लुटीनें लादलेले स्वार व मावळे हमेशप्रमाणें पुढें आपल्या मुलखाकडेस पाठवून देऊन त्यांच्या पिछाडीस कोणी उपद्रव करूं नये म्हणून शिवाजी पाठीमागून चालला होता, तो लागलाच दाऊदास लढाई देण्यास सरसावला. युद्ध मोठें तुंबळ होउन ३००० मोंगल पडले. तेव्हां दाऊद हटला, व शिवाजी सुरक्षित स्वदेशीं आला.

---

## १९—साल्हेरीचा वेढा मऱ्हाठे मोठा पराक्रम करून उठवितात.

पुढें अवरंगझेबानें शहाअलमास दिल्लीस बोलावून



मोहबतखानास दक्षिणचा सुभा दिला. मोहबतखानानें अखलासखान मायणा, अमीरसिंग चंद्रावत वगैरे सरदारांस २००००स्वार बरोबर देऊन साल्हेरीस वेढा घालण्यास पाठविलें. तेव्हां साल्हेरीस वेढा पडला. मोरोपंतांस मावळे घेऊन व प्रतापरावांस पागा घेऊन साल्हेरीस जाण्यास व मोंगलांस मारून वेढा उठविण्यास शिवाजीचा हुकुम झाला. साल्हेरीस येऊन एका तर्फेनें स्वारांनी हल्ला केला व दुसऱ्या तर्फेनें मावळे आंत शिरले. लढाईस येतों ह्मणून सर्वत्र पूर्वीं जाहिरनामा लावून नंतर भरदुपारीं मोंगलांबरोबर मऱ्हाठ्यांनीं मारलेली, अशी हीच पहिली लढाई. या वेळीं शिवाजीचे मावळे व शिवाजीची पागा हीं चांगलीं कसास उतरलीं. ठार झालेले व जायां झालेले मोंगलांचे स्वार व पायदळ मिळून १०००० लोक समरांगणांत पडले. सहा हजार घोडे पकडले ते शिवाजीच्या पागेंत रुजू होऊन, पुढें देशहिताच्या कामीं लागले. राव अमीरसिंग चंद्रावत ठार झाला, व त्याचा मुलगा मोहकमसिंग जखमी होऊन मऱ्हाठ्यांच्या हातीं सांपडला. अखलाखानास बऱ्याच जखमा लागल्या व मऱ्हाठ्यांनीं बंदीवान् केलें. "मालमत्ता, खजिना, जडजवाहीर, कापड, अगणित बिछाईत हातास लागली." बावीस उमराव मऱ्हाठ्यांनीं बंदीवान् केले. सूर्यराव कांकडे ह्मणून एक प्रसिद्ध "धारकरी" शिवाजीचा बाळसंवगडी पांचहजारी होता, तो "जंबुरियाचा गोळा लागून पडला." दिलेरखान वेढा घालणाऱ्या लश्करास कुमक करण्यासाठीं ह्मणून साल्हेरीपासून ४ मजलांवर होता, तो ही मऱ्हाठ्याच्या मोठ्या फत्तेची खबर समजतांच अ-

वरंगाबादेस पळाला. इतक्यांत खानजहान ह्मणून अवरंगझेबाचा दूधभाऊ होता त्यास दक्षिणची सुभेदारी मिळाली. अखलासखान, मोहकमसिंग वगैरे जखमी झालेली मंडळी जखमा ब-या होतांच शिवाजीनें आपल्या संप्रदायाप्रमाणें सोडिली ती खानजहान अहमदनगरीं आला होता त्यास मिळाली व आपापल्या हुद्यावर रुजू झाली.

---

## २०–म-हाठे मोंगलांच्या मुलुखांत धुमाळी चालवितात.

नंतर प्रतापरावानें मोंगलांच्या मुलुखास उपद्रव करण्याचा क्रम सुरू केला. म-हाठ्यांचा पाठलाग खानजहान स्वतः करी किंवा तो करण्यास सजणसिंग बुंदेला, त्याचा बंधु इंद्रमणि, दिलेलखान वगैरे नामांकित सरदार जवळ असत त्यांच्यांतून कोणास तरी पाठवी. मोंगलांनीं व रजपूतांनीं एका शहराहून दुस-या शहरास धर्माचे धक्के खाऊन एकमेकांच्या पुढें मिशांस पीळ भरून फुशारक्या माराव्या व म-हाठ्यांनीं तत्त्वांशीं गांठ पाडून लूट सुरक्षित आपल्या देशांत आणावी, असें कांहीं महिने चाललें. म-हाठ्यांचा उपद्रव मनस्वी होतो, असें पाहून खानदेशांत कांहीं नवे किल्ले बांधवून खानजहानानें वर तोफाही चढविल्या.

---

## २१–विजापुरच्या दरबारीं दोन फळ्या होतात.

इतक्यांत अल्ली अदिलशहा वारला. त्यामुळें विजापुरच्या दर्बारीं दोन फळ्या झाल्या. एका फळीचा

मुख्य अब्दुल करीम हा पठाण असून सेनापति होता. दुसऱ्या फळीचा मुख्य खवासखान हा हबशी असून वझीर होता. मोंगलांची मदत घेऊन शिवाजीस साफ बुडवावें, असें अब्दुल करीम ह्मणे. अवरंगझेब हा मोठा दगा देणारा असल्यामुळें, त्याच्यावर बिलकुल विश्वास न ठेवितां शिवाजीबरोबर मेळ ठेवावा व मोंगलांस दक्षिणेंतून हांकून द्यावें, असें खवासखान ह्मणे. पण सेना अब्दुल करीमाच्या हातीं पडल्यामुळें खवासखानाचें कांहीं चालेना, व अब्दुल करीमानें शिवाजीबरोबरचा पूर्वीचा तह मोडून त्याच्या मुलुखास उपद्रव करण्याचा क्रम चालविला.

## २२–मऱ्हाठ्यांचा विजापुरकरांबरोबर पुनः झगडा चालतो.

ही गुणगुण शिवाजीच्या कानीं येतांच त्यानें आपली सर्व तयारी केली; व अब्दुल करीमाची कुमक पोंचण्याच्या पूर्वींच पन्हाळा घेण्यास अण्णाजी दत्तोस सांगितलें. अण्णाजीनें मावळे बरोबर देऊन मालसांवताजवळून हल्ला करविला. खड्गाखड्गि करावी तर तानाजीच्या देशबांधवांनींच करावी. हिय्या करून पुढें उभे रहाणारे नांवाजलेले रजपूत असोत, पठाण असोत किंवा दिल्लीपतीच्या जातीचे असोत. ते कोणीही व कितीही नांवाजलेले असले तरी शिवाजीचे मावळे एकदा पुढें येऊन ठाकले ह्मणजे एक अकालीं इहलोकाचा त्याग करणें किंवा पुरुषत्वास बट्टा लावून पाठ दाखविणें, या दोहोंशिवाय तिसरी गति त्यांस नव्हती. याप्रमाणें अब्दुल करीमानें

मोंगलांपासून कुमक आणण्याचे पूर्वींच विजापुरकरांबरोब-रच्या विग्रहाची पोथी जी आपल्या वचनाप्रमाणें पितृदर्शन झाल्या दिवसापासून बांधून ठेविली होती ती नाइलाज होऊन शिवाजीनें सोडिली व सूतोवाच केलें.

## २३-जेसरीची लढाई व अबदुल करीमाचा पुरा मोड.

पन्हाळा घेतला हें ऐकून अबदुलकरीम १२००० स्वारांनिशीं मऱ्हाठ्यांचें पारिपत्य करण्यास निघाला. अबदुल करीमास समूळ बुडवावें, असा शिवाजीनें प्रतापरावास हुकुम पाठविला. प्रतापरावानें अबदुल करीमास अशा रीतीनें घेरून टाकिलें कीं त्यास व त्याच्या फौजेस पिण्यास पाणीही मिळेना. तेव्हां अबदुल करीमानें तहाचें बोलणें लाविलें, तें प्रतापरावानें मान्य केलें. अबदुल करीम आपला मोठा द्वेष्टा असून प्रसंगीं पुनः त्रास देण्यास पाठींपुढें पहाणारा नव्हे, अशा समजुतीनें त्यास समूळ बुडवावें, असा हुकूम शिवाजीनें प्रतापरावास फर्माविला होता. तेव्हां अर्थातच शिवाजीस तो तह पसंत पडला नाहीं, व "अबदुल करीमास समूळ बुडविल्याशिवाय तोंड न दाखविणें" अशा अर्थाचा उलट निरोप प्रतापरावास शिवाजीनें पाठविला. कितीही मोठा कामगार असला, तरी त्यास आपल्या आज्ञेचा अतिक्रम ह्मणून शिवाजी करूं देत नसे.

हातून झालेली चूक प्रतापरावाच्या लागलीच लक्षांत आली, व आज्ञातिक्रमाचें महाप्रायश्चित्त घेण्याचा दृढ संकल्प करून त्यानें जेसरी मुक्कामीं अबदुल करीमावर

मोठ्या जोरानें व आवेशानें हल्ला केला. पण प्रतापराव आरंभींच गोळा लागून वीरगतीस गेल्यामुळें मऱ्हाठे पठाणांपुढें हटत चालले, व मऱ्हाठ्यांचा पुरा मोड होण्याचा प्रसंग येऊन पठाण मऱ्हाठ्यांच्या पाठीस लागले. पण हंसाजी मोहिते ह्मणून एक पांचहजारी पाठीं दम खाऊन होता, तो तानाजी पडल्यानंतर जसा सुर्याजी तसा लागलाच आपल्या लोकांनिशीं पुढें झाला. त्याची व त्याच्या लोकांची ती वीरश्री पाहून पळणारे मऱ्हाठे एकदम पाठीं फिरले व पाठलाग करणाऱ्या पठाणांवरच अशा जोरानें तुटून पडले कीं त्यांस "दे माय धरणी ठाय" असें होऊन गेलें. पुढें राजारामाचे कारकीर्दींत चंदीचा वेढा उठवून नांवाजलेला संताजी घोरपडे व लांडगेतोड करून "आतां मरण येईल तर बरें" असें अवरंगझेबास अहमदनगरीं वाटविणारा धनाजी जाधव, या दोघांनीं आपली बहादरी या लढाईंत पाहिल्यानेंच दाखविली.

---

## २४–हंसाजीस लागलेंच सेनापतीचें पद शिवाजीकडून मिळतें.

ही बातमी समजतांच शिवाजीनें हंसाजीची मोठी वहावा केली, व प्रतापरावाच्या मरणानें रिकामी झालेली सर्नोबती त्यास देऊन हंबीरराव असा किताब दिला. पुढें हंबीरराव याच नांवानें हा पुरुष इतिहासांत प्रसिद्ध झाला.

---

## २५-प्रतापरावाच्या मरणानें शिवाजी फार कष्टी होतो.

प्रतापरावांच्या मरणानें शिवाजी फार दिलगिर झाला, व "आज एक बाजू पडली" असा उद्गार त्याचे तोंडून निघाला. पूर्वीं तानाजी पडला तेव्हां एकदा व या वेळीं प्रतापराव पडले तेव्हां, मिळून साऱ्या आयुष्यांत दोनदां अशा प्रकारचे उद्गार शिवाजीच्या तोंडून निघाले. तेव्हां प्रतापरावाची योग्यता निःसंशय मोठीच असली पाहिजे. दरोबस्त दक्षिणेंतील मऱ्हाठ्यांच्या हृदयांत देशाभिमानाचा अग्नि प्रज्वलित करून "प्रतापराव पागा सजीत चालले व शिलेदार मिळवीत चालले; असा जमाव पोक्त केला"—असें शिवछत्रपतीच्या चरित्रांत सभासद ह्मणतात. ज्याप्रमाणें पूर्वीं शिरक्यांचे उपकार स्मरून त्यांची मुलगी येसूबाई शिवाजीनें आपला वडील मुलगा संभाजी यास केली, त्याप्रमाणें प्रतापरावांचे उपकार स्मरून त्यांची एकुलती एक मुलगी जानकीबाई आपला धाकटा मुलगा राजाराम यास पुढें केली.

---

## २६-हंबीरराव संपगांवची लढाई मारितात.

हंबीररावांची लौकरच संपगांवीं हुसेनखान मायणा होता, त्यास बुडविण्यासाठीं शिवाजीनें योजना केली. हुसेनखानाजवळ ५००० पठाण असून तिरंदाज, बरकंदाज वगैरे दुसरी मंडळीही पुष्कळ होती. हुसेनानें हंबीररावांवर हल्ला केला. तुंबळ युद्ध "दोन प्रहर दिवसापासून चार प्रहर रात्रपर्यंत झालें. सहा प्रहरांत कुल

फौज बुडविली. हुसेनखान खांसा धरिला. चार साडेचार हजार घोडीं पाडाव केलीं. बारा हत्ती पाडाव केले."

## २७–मुलुख चौतर्फा सुटूं लागतो व शिवाजी बिलकुल न डगमतां चौतर्फा सुटलेल्या मुलुखाची नीट व्यवस्था लावितो.

संपगांवची लढाई झाल्यानंतर मोरोपंतांनीं हुस्सेनखानाच्या भावापासून कोपल घेऊन तुंगभद्रा नदीपर्यंत शिवाजीच्या राज्याची सीमा नेली. अण्णाजी दत्तोनें सातारा, चंदनवंदन, परळी वगैरे किल्ले घेतले. तिकडील प्रांत पहाण्यास जाऊन खांसा शिवाजीनें "वांईचा कोट घेतला—तसाच कऱ्हाडचा कोट घेतला—शिरोळ, कोल्हापूर हे कोट घेतले—हुकेरी रायबागपर्यंत देश घेतला—मुलूख चौतर्फा सुटला." तेव्हां मोरोपंतांच्या हवालीं शिवाजीनें चऊलपर्यंत उत्तरकोंकण, बारा मावळें व साल्हेरीपर्यंत वरघांट, इतकें केलें; चऊलपासून दक्षिणकोंकण कोपलपर्यंत अण्णाजी दत्तोच्या स्वाधीन केलें; व दत्ताजीपंत वांकनीस यास पन्हाळ्यास ठेवून वरघांट वांईपासून कोपलपावेतों मुलुखाची व्यवस्था पहाण्यास सांगितलें.

द्रव्य पहिल्यानें मिळविण्यास व संचय करण्यास फार प्रयास पडतात; पण एकदां संचय झाला, मग तें पटापट वाढतें. राज्याचीही अवस्था हीच. पहिल्यानें पाया घालून तो फौजेनें व इतर व्यवस्था करून चांगला मजबूत करण्यास अनेक वर्षें खर्चावीं लागतात. पण एकदां पाया पक्का होऊन अंतःकोपाची धास्ती मुळींच

नाहींशी झाली व बहिष्कोपाचा प्रतिकार करण्याचीं साधनें हळू हळू जमत चाललीं—ह्मणजे चौतर्फा मुलुख इतका सुटून जातो कीं शिवाजीसारखा अप्राकृत पुरुष जर प्रधानप्रकृतिस्थानापन्न असून त्याच्या हाताखालीं मोरोपंत व अण्णाजी दत्तो यांच्यासारखे कारकून व प्रतापराव व हंबीरराव यांच्यासारखे सेनापती स्वार्थनिरपेक्ष स्वामिहित करणारे असले, तर मात्र तो आवरतां येतो. नाहींपेक्षां सर्वत्र अंदाधुंदी चालून कोणाचा पायपोस कोणाच्याही पायांत रहात नाहीं.

---

# उत्तरार्ध.

१–शिवाजीस राज्याभिषेक होतो व तेव्हांपासून शिवशक चालू होतो. २-शिवाजी खांसा सैन्य घेऊन कर्नाटकांत स्वारी करितो. ३–शिवाजी लौकरच आपल्या मुलुखीं परत आला त्याचें कारण. ४–शिवाजी विजापुरच्या सुलतानतीस केवळ देशाभिमानानें मदत करितो. ५-संभाजी पळून दिलेलखानाकडेस जातो. ६–शिवाजीची देशभक्ति किती निःसीम होती त्याचें लक्षांत ठेविण्यासारखें एक उदाहरणीय उदाहरण. ७–दिलेलखान इरईस पडून पुनः विजापुरास वेढा घालतो. ८–शिवाजीचा अंतकाळ व मृत्यु. ९–शिवाजीच्या कित्येक गुणांचें संक्षिप्त विवेचन. १०–शिकंदर, केसर, बोनापार्ट व शिवाजी या चार महापुरुषांमधील तारतम्य.

## १–शिवाजीस राज्याभिषेक होतो व तेव्हांपासून शिवशक चालू होतो.

हा वेळपर्यंत पुष्कळ वर्षं शिवाजी आपल्या नांवाचें

नाणें पाडीत होता, तरी अभिषेकाचा विचार त्यानें केला नाहीं. पण मोरोपंतांनीं व प्रतापरावांनीं भरदुपारीं लढाई मारिली, व शौर्यासाठीं नर्मदेच्या उत्तरेस नांवाजलेले रजपूत, पठाण व मोंगल या तिहींसही नामोहोरम करून साल्हेरीचा वेढा उठविला; याप्रमाणें दिल्लीच्या पादशहातीबरोबर पुरी विजयान्त टक्कर मारली, इतकेंच नाहीं, तर हंसाजी मोहिल्यानें मोठा पराक्रम करून अबदुल करीमाचा पुरा मोड केला व विजापुरच्या पादशहातीस मावळ्यांची व बारगिरांची वीरश्री पाहून तोंडांत बोट घालायास लाविलें. असें जेव्हां शिवाजीनें पाहिलें, तेव्हां मोंगल व तुर्की पादशहातीप्रमाणें मऱ्हाठी पादशहातीची उघडपणें प्राणप्रतिष्ठा करिण्याचा निश्चय करून गागाभट्ट नांवाचा विद्वान् ब्राह्मण काशींत होता त्यास बोलाविलें, व शालि० शके १५९६ ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीस अभिषेक करून घेऊन तेव्हांपासून लागलीच अभिषेकशकास सुरवात केली. शिवाजीचा अभिषेक पाहून जिजाबाई कृतकृत्य झाली, व लौकरच तिनें इहलोकाचा त्याग केला. शिवाजीचे वंशज कोल्हापुरचे राजे हे कागदोपत्रीं शिवशकाचाच उपयोग करीत असतात.

---

## २-शिवाजी खासा सैन्य घेऊन कर्नाटकांत स्वारी करितो.

तंजावर प्रांत शहाजीच्या पश्चात् शिवाजीचा सावत्र भाऊ वेंकाजी याच्या ताब्यांत होता. नारोपंत हणमंते नांवाचा एक अति विश्वासू व कर्ता ब्राह्मण शहाजीचा मुझुमदार होता. तो वारला तेव्हां त्याचे मुलगे जना-

र्दनपंत व रघुनाथपंत हे त्याचें काम चालवूं लागले. हे दोघेही बंधु मोठे समंजस व शहाणे निघाले; पण रघुनाथपंताचे आंगीं कर्तृत्व थोडें जास्त होतें. ज्याप्रमाणें शहाजीच्या एका मुलानें मऱ्हाठ्यांस महाराष्ट्रमंडळांत नांवारूपास आणिलें, त्याप्रमाणें दुसऱ्या मुलानें द्रविडमंडळांत आणावें, अशी रघुनाथपंताची उत्कट इच्छा होती. पण वेंकाजी कांहीं शिवाजी नव्हता व वेंकाजीची जन्मदात्राही जिजाबाई नव्हती. वेंकाजीस रघुनाथपंतांचा कडक स्वभाव व शिस्त आवडतनाशीं झाली, कारण कीं त्याच्यांत गर्भश्रीमंताचीं लक्षणें पूर्णपणें वसत होतीं. रघुनाथपंतासारखे शुद्ध स्वजनहित व स्वप्रभुहित पहाणारे ब्राह्मण आह्मांमध्यें पूर्वींच्या काळीं बरेच होऊन गेले व हल्लींही क्वचित् क्वचित् चमकत आहेत, या गोष्टीचा आह्मीं महाराष्ट्रमंडळांतील ब्राह्मणांनीं चांगला अभिमान बाळगिला पाहिजे. जर रघुनाथपंत आपमतलबी असता, तर वेंकाजीस अधिकाधिक व्यसनार्णवांत पाडून आपला हुद्दा नीट सांभाळून रहाता. पण रघुनाथपंत जात्या मोठा निस्पृह पडला. वेंकाजीपासून आपल्या महाराष्ट्रमंडळाचें हित होण्याचा बिलकुल संभव नाहीं असें पाहून शिवाजीचा पाय द्रविडमंडळांत पाडण्याचा त्यानें विचार केला, व शिवाजीसाठीं कांहीं राजकारणें सिद्ध करून ठेविलीं. पुढें भागानगरीं मादण्णापंताकडेस जाऊन प्रसंगीं विजापुरकरांचा मुलुख काबीज करण्यास भागानगरकरांनीं पैशाची मदत शिवाजीस करावी अशा प्रकारचें बोलणें लावून ठेविलें, व तेथून सहकुटुंब आपल्या वडील बंधूस बरोबर घेऊन रघु-

नाथपंत महाराष्ट्रमंडळांत शिवाजीकडेस आले. मादण्णापंत हा ब्राह्मण या काळीं मोठा शहाणा व कर्त्ता असून कुतुबशाहीचा एकटा सूत्रधार होता.

आपण गेल्यानंतर पाठीं मोंगलांनीं घोटाळा करूं नये ह्मणून अवरंगाबादेस खानजहानाजवळ निराजीपंतास आपला हेजीब या नात्यानें ठेवून व उभय बंधूंस बरोबर घेऊन शिवाजी भागानगरास निघाला. निराजीपंतांचा मुलगा प्रल्हादपंत हा भागानगरीं शिवाजीचा हेजीब होता, त्यानें मादण्णापंतास शिवाजी येणार ही वर्दी पूर्वींच देऊन ठेविली होती. शिवाजीबरोबर हंबीरराव सेनापति असून २५००० स्वार व १५००० मावळे, मिळून ४०००० फौज होती. आपल्या मुलुखास उपद्रव होऊं नये, ह्मणून भागानगरकर शिवाजीस दरवर्षीं चार लक्ष होन खंडणी देत असत. कर्नाटकांत स्वारी करायाची, तिच्या खर्चासाठीं कांहीं वर्षांची खंडणी अगाऊ मिळावी, ह्मणून शिवाजीनें भागानगरास जाण्याचा हा सर्व खटाटोप केला. शिवाजीचा मनोरथ भागानगरकरांनीं पूर्ण केला, व लागलीच शिवाजीची स्वारी दक्षिण दिशेकडेस वळली.

चंदी प्रांतीं आल्यानंतर पहिल्यानें येल्लुरास मोरचे लाविले. त्रिमली महालांत शीरखान ह्मणून सरदार ५८०० पठाण बाळगून होता, तो येल्लूरचा वेढा उठविण्यास कदाचित् येईल, अशी शंका आली; व त्यामुळें १०००० मावळे नरहर बल्लाळ सबनीस ह्याच्या जवळ ठेवून, शिवाजी खासा शीरखानावर गेला. शत्रूची कुमक येण्याचा संभव असतो, तेव्हां दरोबस्त वाटा मारून

ती न येऊं देणें व प्रसंगीं कुमक पाठविणाऱ्या शत्रूवर व त्यानें पाठवायाच्या किंवा पाठविलेल्या कुमकेवर घाला घालून दोहोंसही बुडविणें, हा खऱ्या सेनापतीचा पहिला धर्म होय. इतर अनेक लोकोत्तर गुणांप्रमाणें हाही एक लोकोत्तर गुण शिवाजीमध्यें पूर्णपणें वसत होता. शीरखानास बुडवून शिवाजी परत आला, तों नरहरपंतानें येलूरचा कोट घेतला. रघुनाथपंतानें राजकारण पूर्वींच सिद्ध करून ठेविलें होतें, ह्मणून पुढें नांवाजलेला चंदीचा विशाळ व मजबूत किल्ला मऱ्हाठ्यांच्या रक्ताचा एक थेंबही पडल्याशिवाय साध्य झाला. चंदी प्रांतीं शहाजीचीं कांहीं-जुनीं माणसें राहिलीं होतीं, तीं आतां शहाजीच्या नांवाज-लेल्या मुलास भेटायास आलीं, व त्या सर्वांचा शिवाजीनें यथायोग्य सत्कार केला. संताजी ह्मणून शहाजीच्या नाटक-शाळेचा पुत्र होता तो भेटायास आला, तेव्हां त्याचा शिवाजीनें अगदीं सख्ख्या भावाप्रमाणें मान ठेविला. नंतर वेंकाजी भेटायास आला. तेव्हां शहाजीचीं बारा बिरुदें वेंकाजीजवळ होतीं, तीं शिवाजीनें मागितलीं. ज्या पुरुषानें आपल्या बापाच्या नाटकशाळेच्याही पुत्राचा बहुमान केला व त्यास एकदम एकहजारी देऊन नांवाजिलें, तो काय आपल्या सावत्र भावास बुडविण्यास पाहील? किंवा चिटणिसांनीं तर्क केला त्याप्रमाणें बापाच्या जहागिरीचा निम्मे वांटा त्याच्याजवळ मागेल? नाहीं. असें कालत्रयींही होणें नाहीं. रघुनाथपंतासारख्या शहाण्या, कर्त्या व एकनिष्ठ पुरुषाचें वेंकाजी ऐकत नाहीं; हें ऐकून शिवाजीस मनस्वी खेद झाला, व बंधुप्रीतीनें वेंकाजीची कानउघडणी करावी, हा एक शिवाजीच्या कर्नाटकांतील

स्वारीचा मुख्य उद्देश होता. पण ज्या लोकांच्या संगतीनें वेंकाजी रघुनाथपंताचें ऐकेनासा झाला होता, ते लोक जवळ होतेच. "तुला पदच्युत करून तुझी सर्व जहागीर शिवाजी बळकविणार" अशा प्रकारची धास्ती त्यांनीं वेंकाजीस घातली व तो अप्रबुद्ध मनुष्य तिच्या संभाव्यासंभाव्यत्वाचा बिलकुल विचार न करितां पळाला, तो कुचावर कूच करीत कांहीं न खातां न पितां जसा काय एखादा ब्रह्मराक्षस पाठीं लागल्यामुळेंच २४ तासांत १२० मैल चालला व चंदावरास बिरुदें घेऊन आला. दुसरे दिवशीं वेंकाजी पळाला हें समजलें, तेव्हां शिवाजी खंती होऊन ह्मणाला, "वेंकाजी राजे काय निमित्त पळाले? आह्मीं त्यांस धरीत होतों कीं काय? आह्मांस बिरुदें काय करावयाचीं? आमचीं बिरुदें अष्टदिशेस लागलीं आहेत. समुद्रवलयांकित भूमंडळीं आपली कीर्ति झाली आहे. तेथें बिरुदें काय करावयाचीं? वडिलांची वस्त असावी ह्मणून मागितली होती. पळावयाचें नव्हतें. द्यावयाचीं नव्हतीं, तर न देणें. उगेच उठून पळून गेले. आते धाकटे ते धाकटे. बुद्धिही धाकटेपणाची योग्य केली." हें शिवाजीचें बोलणें अक्षरशः खरें होतें. फक्त शहाजीचीं बिरुदें घेऊन सर्व जहागीर वेंकाजीस द्यावयाचा शिवाजीचा मानस दिसतो. इतकेंच कीं रघुनाथपंतास कुळकारभारी करून मऱ्हाठ्यांची उन्नति होईल असेंच वर्तन ठेविण्याचें पहिल्यानें वेंकाजीकडून कबूल करून घ्यायाचें. पण वेंकाजी पळून गेला, तेव्हां शिवाजीचा केवळ नाइलाज झाला. अधिक दिवस रहाण्यास तर शिवाजीस फुरसत नव्हती. ह्मणून रघुनाथपंतास तंजावरची सर्व मुजमु सांगून हंबीररावास १००००फौजे-

निशीं बंदोबस्तासाठीं त्याच्याजवळ ठेविलें, व शिवाजीची स्वारी आपल्या मुलुखीं परत आली.

---

## ३-शिवाजी लौकर आपल्या मुलुखीं परत आला त्याचें कारण.

अशा रीतीनें लौकर शिवाजीस परत येण्यास एक राजकारण झालें. खानजहानाची शिवाजीस फारशी धास्त नव्हती. पण विजापुरीं खवासखान व अबदुल करीम या दोन कारभाऱ्यांमध्यें तंटा लागून, अबदुल करीमानें खवासखानाचा खून केला. ही बातमी जेव्हां दिल्लीस समजली, तेव्हां दिलेलखानास अवरंगझेबानें खानजहानास मदत करण्यास ह्मणून पाठविलें. दिलेलखानाप्रमाणें अबदुल करीम हाही जातीनें पठाण होता. हे दोघेही शिवाजीचे मोठे हाडवैरी होते. हे दोघे मिळून गेले व त्यांनीं खानजहानाविषयीं गुप्त पत्रें लिहून चहाडी केली. तेव्हां अवरंगझेबानें खानजहानास पाठीं बोलावून दिलेलखानास सुभेदारी सांगितली; व अबदुल करीमाच्या साहाय्यानें विजापुरांतील दक्षिणी मुसलमान, भागानगरकर व शिवाजी या तिहींसही बुडविण्यास हुकूम फर्माविला. ही बातमी समजल्यामुळें शिवाजीस लागलेंच कर्नाटकांतून निघावें लागलें. विजापुरीं दक्षिणी मुसलमान होते त्यांची शिवाजीवर भिस्त विशेष होती. पठाणांनीं अनेक वेळां विजापुरकरांस दगा दिला होता, व अबदुल करीमानें, आपल्या देशाभिमानावर पाणी ओतून दक्षिणी मुसलमान समूळ बुडविण्यासाठीं ह्मणून दिलेलखानाबरोबर पुष्कळ कट ठेविला होता. हें सर्व शिवाजी नीट जाणून होता.



खवासखानाच्या पाठीं त्याचा मुलगा मसाऊद ह्मणून होता तो दक्षिणी मुसलमानांचा मुख्य सरदार झाला व त्यानें दरोबस्त कच्ची हकीकत शिवाजीस कळविली. शिवाजीमध्यें दक्षिणी हा अभिमान विशेष वागत होता. ह्मणून परक्या दिल्लीपतीस स्वकीय विजापुरकरांस बुडवूं द्यावयाचें नाहीं, असा केवळ देशाभिमानानें त्यानें संकल्प केला होता. अशा प्रकारें अनेक प्रसंगीं जातीची किंवा धर्माची मुळींच मातब्बरी न राखतां, केवळ देशाभिमानानें पात्र पाहून त्याच्यावर विश्वास व जबाबदारी ठेवीत गेल्यामुळें, शिवाजी चांगला सांवरला व मऱ्हाठेशाहीचा बराच मजबूत पाया घालूं शकला. अवरंगझेब पुष्कळ बुडाला, तो पात्रापात्रत्वाचें तारतम्य समजण्याचा गुण आंगीं बिलकुल नसल्यामुळें हिंदूंपैकीं व अविंधांपैकीं कोणावरही विश्वास न ठेवून बुडला.

---

## ४-शिवाजी विजापुरच्या सुलतानतीस केवळ देशाभिमानानें मदत करितो.

जेव्हां शिवाजी आपल्या मुलुखीं आला, तेव्हां दिलेलखान विजापुरावर केलेल्या स्वारींत गुंतला होता. वाटेवर दक्षिणींनीं मोंगलांस मनस्वी उपद्रव दिला. दिलेलखानास पाठीं ओढण्यासाठीं ह्मणून लश्कर घेऊन शिवाजी खांसा मोंगलाणांत शिरला. जालनापुर ह्मणून अवरंगाबादेजवळच एक पैशानें भरलेली मोठी पेंठ होती, ती मारून शिवाजी मोंगलांचा देश लुटून फन्ना करीत चालला. नंतर पटागडास येत असतां संगमनेराजवळ रणमस्तखान

एकाएकीं दहा पंधरा हजार फौज घेऊन आला; व त्याच्याबरोबर चकमक झडत आहे, इतक्यांत मिर्झाराजाचा नातू किसनसिंग व सरदारखान वगैरे उमराव आणखीं पांच सात हजार फौज घेऊन त्याच्या कुमकेस आले. लढाई मोठी अरेतुरेची झाली. तींत शिदोजी निंबाळकर पांचहजारी पडला. जसा पूर्वी पन्हाळगडीं तसा आतां या प्रसंगीं, मिळून सगळ्या आयुष्यांत सगळा दोनदां शिवाजी थोड्या विवंचनेंत पडला; कारण या वेळीं लुटीनें लादलेलीं उंटें, हत्ती व घोडे बरोबर पुष्कळ असल्यामुळे त्याची थोडी तारंबळशी झाली. इतक्यांत बहिरजी जासूद पुढें आला, व त्यानें दरोबस्त लूट व कुचावर कूच करून थकलेले लोक अनेक वाटांनीं सुरक्षित पटागडास नेण्याचें कबूल केल्यामुळें त्यास निरोप देऊन शिवाजीनें आपला घोडा लागलाच पुढें घातला. मोंगलांवर मोठ्या नेटानें व निकरानें हल्ला करून, शिवाजीनें त्यांस आपलें धैर्य व शौर्य आणखीं एकदा दाखविलें; व महाराष्ट्र लोकांचा रणभूमीवर हट्ट व काटकपणा प्रसंगीं किती असतो त्याचा मोंगलांस आणखीं एकदा आमरण न विसरण्याजोगा चांगला अनुभव दिला. सारांश, या प्रसंगीं वरच्या बाजूस शिवाजीकडून व विजापुरच्या पंचक्रोशींत दक्षिणी मुसलमानांकडून, असा मृदंगाप्रमाणें दोन्ही बाजूंनीं मोंगलांस खूब मार बसला. इतक्यांत अबदुल करीम मरायास टेंकला व लश्करांत दाण्याचा दुष्काळ पडल्यामुळें दिल्लेलखानास मसाउदाबरोबर तह करणें भाग पडलें; व शिवाजीनें रणमस्ताची मस्ती मोडून लूट उमाप नेल्यामुळें सुभेदारीचा बंदोबस्तही नीट राखितां येत

नाहीं, असा आरोप येऊन तोंड काळें करून जाण्याचा प्रसंग दिलेलावर आला.

---

## ५-संभाजी पळून दिलेलखानाकडेस जातो.

पण दैवानें आजून दिलेलखानाकडेस पुरें तोंड फिरविलें नव्हतें, ह्मणून संभाजीसारखें सावज पन्हाळगडाहून सुटून त्याच्या हातीं पडलें. संभाजीस नाटकशाळांची व गांजेकमूची सोबत लागल्यामुळें शिवाजीनें पन्हाळगडावर ठेविलें होतें. बादशहाजवळून शिवाजीचा मुलुख देववून तुला नांवाजितों, अशा प्रकारची थाप मारल्यामुळें मूर्ख संभाजी फसला व दिलेलखानाकडेस पळून आला, असें दिसतें. दिलेलखानानें अखलासखान व आपला पुतण्या विरुतखान या दोहोंसही संभाजीस सामोरें जाण्यास पाठविलें. संभाजी आल्यानंतर सर्व हकीकत अवरंगझेबास दिलेलखानानें कळविली व "राजा" हा किताब, सातहजारी व हत्ती देऊन संभाजीस नांवाजावें, अशी शिफारस केली. संभाजीस बरोबर घेऊन दिलेलखानानें भूपाळगडास मोर्चे लाविले. भूपाळगडचा हवालदार यावेळीं चाकणच्या गडावर सुप्रसिद्ध झालेला फिरंगोजी नर्साळा होता. फिरंगोजी कांहीं भित्रा किंवा कच्चा नव्हता. पण दिलेलखानानें संभाजीस अगदीं लश्कराच्या पुढें ठेविलें. प्रभुपुत्रावर गोळा टाकण्यास फिरंगोजीची छाती झाली नाहीं, व त्यामुळें किल्ला मुळींच न भांडतां मोंगलांच्या हवालीं करून फिरंगोजी शिवाजीकडेस आला.

---

## ६–शिवाजीची देशभक्ति किती निःसीम होती, त्याचें लक्षांत ठेवण्यासारखें एक उदाहरणीय उदाहरण.

ही हकीकत ऐकून शिवाजीस आपल्या पुत्राच्या वर्तणुकीविषयीं अतिशय वाईट वाटलें व खेद झाला, त्यांत नवल नाहीं. पण शिवाजीची देशभक्ति निःसीम व निष्काम होती. देशभक्ति असावी, तर शिवाजीची होती तशी असावी. आपला मुलगा देशद्रोही झाला असें पाहून, तो शत्रूप्रमाणें पुढें आल्यास त्याच्यावर बेलाशक गोळा चालवावा, असा दरोबस्त गडावरील हवालदारांस शिवाजीनें हुकुम फर्माविला. असा हुकुम शिवाजीनें फर्माविला, हें ऐकिलें तेव्हांच दिलेलखानाचे हातपाय गळाले. तशांत अवरंगझेबानें दिलेलखानाच्या शिफारशीकडे बिलकुल लक्ष न पोंचवितां उलट संभाजी कदाचित् आपल्या लश्करांत फितवा करण्यासाठीं आला असेल त्यापक्षीं त्याच्यावर सक्त डोळा ठेवावा, असा हुकुम दिलेलखानास पाठविला. तेव्हां दिलेलखान अगदीं उदास झाला; व आपलें कांहीं वळत नाहीं, असें पाहून एके दिवशीं संभाजीची स्वारी बापाकडेस परत पळून आली.

---

## ७–दिलेलखान इरईस पडून पुनः विजापुरास वेढा घालतो.

जेव्हां तोफांची मारगिरी विजापुरच्या किल्ल्यावर पुनः सुरू झाली, तेव्हां मसाउदानें विजापुरच्या सुलतानतीची अब्रु राखण्यासाठीं शिवाजीस आणखीं एकदा पत्र पाठविलें. शिवाजीनें शुद्ध देशभक्तीनें पुनः अविंधांच्या

सुलतानतीचा मान राखण्याचा निश्चय केला व दिलेल-खानाची रसद बंद करण्याच्या कामीं हंबीररावाची योजना केली. हंबीररावानें हमेशप्रमाणें कामगिरी उत्तम रीतीनें बजाविली. रणमस्तखान आठ दहा हजार फौज व पुष्कळ सामग्री बरोबर घेऊन अवरंगाबादेहून दिलेल-खानाच्या कुमकेस ह्मणून निघाला होता, त्यास मारीत पिटीत व हैराण करीत मऱ्हाठ्यांनीं पुनः अवरंगाबादेंतच घुसण्यास लाविलें. बागलाण व खानदेश यांत मोरोपंत पेशव्यानें २०००० फौजेनिशीं सतत फिरत राहून मऱ्हाठ्यांच्या नांवाचा दरारा बसविला होता, ह्मणून तोही सामग्रीचा रस्ता बंद झाला. याप्रमाणें वाटा मारून टाकल्यामुळें, दिलेलखान वेढा उठवून शंकर नांवाचें विजापुराजवळच एक खेडें आहे, तें लुटण्यास गेला. दिलेलखान लुटतो हें पाहून खेड्यांतील लोक चिडले व मरण तृणवत् मानून दिलेलखानाच्या व त्याच्या लोकांच्या पाठीस लागले. तेव्हां सांभाळीत सांभाळीत दिलेलखान कोपल प्रांताकडेस वळला. तेथें जनार्दनपंत हणमंते होते, त्यांनीं हुसेनखान मायण्याचा भाऊ कासिमखान मायणा दोन तीन हजार स्वारांनिशीं आला होता त्यास त्याच्या कबिल्यासह व हुसेनखानाच्या दोघां मुलांसह पकडून ठिकठिकाणीं ठाणीं बसविलीं होतीं. हुसेनखान व सर्जेखान यांस घेऊन दिलेलखान येतो हें ऐकून जनार्दनपंत पांच सहा हजार स्वार घेऊन निघाले; व जेथें तो जाई तेथें हे ठेवलेले, अशी स्थिती झाल्यामुळें दिलेलखान अगदीं रडकुंडीस आला व पुरा फजीत होऊन भीमानदी उतरला तो पेडगांवास पळाला.

## ८-शिवाजीचा अंतकाळ व मृत्यु.

याप्रमाणें शिवाजीनें मऱ्हाठेशाहीची प्राणप्रतिष्ठा केली, इतकेंच नाहीं, तर विजापुरच्या सुलतानतीचाही अखेरीस मान राखून, जसें दक्षिणतील मऱ्हाठ्यांजवळून तसेंच दक्षिणेंतील अविंधांजवळून धन्य ह्मणवून घेतलें. लौकरच आपल्या मुलुखास विजापुरकरांनीं इतःपर उपद्रव करूं नये व आपण जिवंत आहों तोंपर्यंत आपणांकडूनही विजापुरकरांच्या राहिलेल्या मुलुखास उपद्रव होणें नाहीं, असा मसाउदाबरोबर शपथपूर्वक करार करून शिवाजीची स्वारी राजारामाचें लग्न करून पुढील व्यवस्था करण्याच्या उद्देशानें रायगडीं आली. प्रतापराव गुजर यांचे आपणांवर व दरोबस्त महाराष्ट्रमंडळावर झालेले उपकार स्मरून त्यांची मुलगी जानकीबाई आपला मुलगा राजाराम यास नेमस्त केली. विवाहसमारंभ आटपला व पुढची व्यवस्था आतां करायाची; इतक्यांत ज्वराची व्यथा होऊन सुर्याजी मालुसरे वगैरे हुजरेमंडळी व रामचंद्रपंत, प्रल्हादपंत वगैरे कारकूनमंडळी सभोंवती बसली असतां, अकाळीं आपल्या वयाच्या त्रेपन्नाव्या वर्षीं शालि० शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे, चैत्र शुद्ध १५ रविवारीं दोन प्रहरीं हा मऱ्हाठा पुण्यश्लोक स्मृतिशेष होऊन, अशेष महाराष्ट्रमंडळास अगाध शोकोदधींत मग्न करिता झाला.

---

## ९-शिवाजीच्या कित्येक गुणांचें संक्षिप्त विवेचन.

शिवाजी हा अलौकिक पुरुष होता. जशी मुलुखी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

बंदोबस्तांत त्याची मति चालत होती; तशीच लश्करी बंदोबस्तांत चालत होती. लश्करांत जो कोणी बायको किंवा बटीक किंवा कलावंतीण नेईल, त्यास देहान्त शिक्षेचा कित्ता शिवाजीनें घातला. अमली मनुष्यास शिवाजी आपल्या पदरीं ठेवीत नसे. जो लढाईत जखमी होई त्यास त्याच्या जखमेप्रमाणें पंचवीस, पन्नास, शंभर किंवा दोनशें होन बक्षीस मिळत; व जो समरांगणांत देशासाठीं प्राणास मुके त्याच्या मुलांस आपल्या पदरीं ठेवून त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांस वेतन करून देई, व जर प्राणास मुकणारा मनुष्य निपुत्रिक असला तर त्याच्या बायकोस निमे वेतन मिळे. त्यामुळें दरोबस्त पागे व मावळे शिवाजीस केवळ आपला मायबाप समजून, अगदीं बेफिकिरीनें व बेपर्वाईनें लढत. गड असतील त्यांत सर्नोबत जातिवंत क्षात्रिय असे, सबनीस ब्राह्मण असे व कारखाननीस कायस्थ असे. महाराष्ट्र देशांत प्रधान जाती काय त्या या तीनच आहेत. गड व पागा या तीन्ही जातींतील पुरुषांच्या ताब्यांत राहिल्यामुळें, एकमेकांवर एकमेकांचा दाब राहून प्रसंगीं फितुरी होण्याचा किंवा प्रधान जातींपैकीं कोणत्याही जातीमध्यें कुरकुर व असंतोष रहाण्याचा संभव नव्हता. यावरून असें कोणी समजूं नये कीं वरिष्ठ जातींची यथायोग्य तजवीज करून अतिशूद्रादिक कनिष्ठ जातींस शिवाजी अगदीं विसरून गेला. त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांस गडावर व पागेंत कामगिरी सांगून त्यांचाही महाराष्ट्रमंडळांत शिवाजीनें नीट समावेश करून ठेविला. सारांश क्षत्रिय असो, ब्राह्मण असो, कायस्थ असो

किंवा महार असो; जो कोणी मऱ्हाठा ह्मणून असेल त्यास दरोबस्त महाराष्ट्देश आपलासा वाटून प्रत्येकानें यथाशक्ति काम करावें व प्रसंगीं प्राणव्ययानेंही आपल्या मंडळाचें हित करण्यास चुकूं नये, असें शिवाजीनें करून ठेविलें होतें. अविधांस आपल्या पदरीं ठेविण्यास शिवाजी फारसा राजी नसे, त्याचें कारण त्यांच्यामध्यें धर्मवेड प्रायः मनस्वी भरलेलें असतें हें होय. धर्मवेड फाजिल असलें, ह्मणजे धर्मबांधवांबरोबर जुटीनें राहून प्रसंगीं स्वदेशद्रोह व स्वजनद्रोह करण्यास पुरुष चुकत नाहीं, असें शिवाजीचें मत दिसतें. तरी ज्यास एकदां ओळखिलें तसल्या अविंधास शिवाजी पदरीं राखी; इतकेंच नाहीं, तर त्याच्या योग्यतेप्रमाणें त्याची बढती करण्यास तो कधींही विसरत नसे. इतकेंच कीं ऐकान्तिक देशभक्ति करण्याचें महाव्रत त्यानें पत्करलें, अशी मात्र शिवाजीची खात्री एकदां झाली पाहिजे. शिवाजीचा मुजुमदार आबाजी सोनदेव ब्राह्मण, तर बाळाजी प्रभु चिटणीस व क्षत्रिय बहिरजी नाईक हा मुख्य जासूद. इब्राहिमखान हा जातीचा अविंध ह्मणून पहिल्यानें त्यास आर्मारचें मुख्यपण देतांना मायनाक नांवाच्या भंडारी मऱ्हाठ्यास त्याच्या बरोबरीच्या नात्यानें ठेविलें होतें. पण एकदां इब्राहिमखानाची निष्काम देशभक्ति शिवाजीच्या लक्षांत आली, तेव्हां त्याच्या बरोबरीचा किंवा त्यास वरिष्ठ असा दुसरा अंमलदार न ठेवितां, शिवाजीचा सर्वस्वीं भरंवसा या एकट्या अविंधावर राहिला; व तो अपात्रीं राहिला, अशी शिवाजीचे स्वप्नींही शंका येण्याचा प्रसंग इब्राहिमखानानें आणिला नाहीं. अशा

रीतीनें महाराष्ट्रमंडळांत विलकुल भेददृष्टि ठेविली नाहीं ह्मणून बाजीप्रभु व मुरारराव यांच्यासारख्या स्मरणीय व संमाननीय कायस्थांनीं आपल्या देशजननीच्या रक्षणार्थ पाठीपुढें न पाहतां पाण्याप्रमाणें आपलें रक्त ओतिलें. आंगांत गुण असले ह्मणजे जातीचा कोणीही असो, त्यास शिवाजीच्या पदरीं आश्रय मिळविण्यास किंवा बढती करून घेण्यास फारसे आयास पडत नसत. कितीही मोठा हुद्देदार असला, तरी त्यास जर आपला जोखिमाचा हुद्दा नीट चालवितां आला नाहीं, तर त्यास दूर करून दुसऱ्या योग्य व गुणी पुरुषाची नेमणुक हुद्यावर शिवाजीकडून करण्यांत येई. आपला संबंधी तर काय, पण जरी आपला साक्षात् भाऊ किंवा मुलगा असला, तरी त्यास विशेष जोखिमाची जागा त्याच्या आंगीं योग्यता दिसल्याशिवाय शिवाजीच्या हातून मिळण्याचा संभव मुळींच नव्हता. कदाचित् एखादेवेळेस त्यास पहिल्यानें मोठी जागा मिळून तो पुढें नालायक ठरला, तर त्याची तेथून उचलबांगडी करण्यास शिवाजीसारखा पुरुष संकोच वाळणारा नव्हे. शहाजीचा आनंदराव ह्मणून पाळलेला मुलगा व वेंकाजीपंत ह्मणून ब्राह्मण या दोहोंसही पूर्वीं तंजावराहून येतांच पांचहजाऱ्या मिळाल्या, त्या त्यांच्या आंगीं इष्ट गुण शिवाजीस दिसले, ह्मणून मिळाल्या. पुढें शिवाजीबरोबर व प्रतापरावांबरोबर आनंदराव व वेंकाजीपंत हे हमेश जात व आपलें पौरुष दाखवीत, ह्मणून त्या कायम राहिल्या. सुरत तिसऱ्या खेपेस लुटली, तेव्हां हे दोघेही शिवाजीच्याबरोबर असून लढाई करण्यास पहिल्यानें सरसावले. प्रतापरावांनीं साल्हेरी-

चा वेढा उठविला, तेव्हांही या दोघांनीं आपली तलवार गाजविली. वेंकाजीपंतांस एकदा बारा जखमा लाग-ल्या, तरी जंजिरेकरांस त्यांनीं जर्जर करून तह कर-ण्यास लाविलें. जर हें धाडस व हें शौर्य आंगीं नसतें, तर यांच्या पांचहजाऱ्या जाण्यास फारसे दिवस लागले नस-ते. शामराजपंत नालायक ठरल्यामुळें त्याची पेशवाई मोरोपंतास मिळाली व नालायकीमुळेंच निताजीची सनोवती दूर होऊन प्रतापराव गुजर सनोबत झाले. याप्रमाणें पदरचीं माणसें निवडलेल्या मोत्यांप्रमाणें असून कैद सख्त असल्यामुळें, जरी शिवाजी दिल्लीहून निघाला तो आठ महिने यात्रा करीत राहिला, तरी पाठीमागें रा-ज्यकारभारांत तिळभर देखील उणें पडलें नाहीं.

जहागीर तोडून देण्यास शिवाजी अगदीं नाखुश असे. जे जहागीरदार व हक्कदार अंमलांत येत, त्यांस स्वतःच्या स्वतंत्र कारकुनांनीं शिवाजी कधींही वसूल घेऊं देत नसे. सर्व मुलुखांत अंमल काय तो एका शिवाजीच्या कारकु-नांचा. देशमुख वगैऱ्यांचे गड असतील ते लहान अ-सल्यास शिवाजी जमीनदोस्त करी, व नामांकित अस-ल्यास त्यांत आपलीं ठाणीं ठेवून सर्व सत्ता आपल्या हातीं घेई. त्यामुळें शिवाजीच्या मुलुखांत बंडावा किंवा पुंडाई करण्याची कोणाची शक्ति झाली नाहीं. तेव्हां देशमुख वगैऱ्यांस जरी शिवाजी साक्षात् काळाप्रमाणें भासे तरी रयतेचा तो मायबाप असे. पिकाच्या पांच तक्षिमा करून तीन रयतेच्या व दोन आपल्या, असा कित्ता शिवाजीनें घातला. इतका राजभाग एव्हांच्या काळीं बाहे-रून जबर दिसतो. पण वास्तविक विचार करितां तो जबर

न्हता. एव्हां अनेक प्रकारच्या गांजणाऱ्या व पिळणाऱ्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पट्टया असतात तशा, त्या काळीं न्हत्या. तशांत रोख नाण्यासाठीं शिवाजी रयतेस पिळीत नसे, हीही एक मुख्य गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. जें पीक होई त्याचे भाग शिवाजीस मिळत. पीक कमी झालें, तर राजभाग कमी झाला, अशी स्थिति असल्यामुळें रयतेवर ओझें पडत नसे. एव्हां अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पट्टया रयतेस द्याव्या लागतात; इतकेंच नाहीं, तर राजभाग रोख नाण्यानें द्यावा लागतो ह्मणून नाणेवाल्याचें पिकून रयत प्रायः गांजलेली असते. जी रयत नवी येईल तीस गुरें ढोरें, बियाणें व खाण्यास दाणा वगैरे लागेल तें पहिल्यानें सरकारी पैक्यानें देऊन तो पैका दोनचार वर्षांनीं हळू हळू रयतेच्या पिकापाण्याकडेस व कुटुंबाकडेस नजर देऊन उगवून घेण्यास शिवाजी कारकुनांस सांगे. मिर्झा राजाबरोबर जो लौकरच तह केला त्याचें एक कारण आपल्या मुलुखांतल्या रयतेस शत्रूचा फारसा उपद्रव होऊं नये, हें दिसतें. आपल्या मुलुखास अमुक बाजूनें शत्रूचा उपद्रव होऊन रयतेचें नुकसान होतें, असें एकदा शिवाजीच्या नजरेस आलें, ह्मणजे नवीन गड बांधून नीट बंदोबस्त करण्यास शिवाजी कधींही चुकत नसे. निंबाळकर, घाटगे वगैरे विजापुरचे सरदार उघड्या मुलुखांत येऊन पुंडावा करीत, तो बंद करण्यासाठीं वारुगड, भुषणगड, महिमानगड, वर्धनगड, सदाशिवगड व मच्छेंद्रगड हे किल्ले शिवाजीनें मुद्दाम बांधिले. सारांश, बादशाही मुलुखांतील मऱ्हाठ्यांनीं आपण होऊन आपल्या मुलुखांत वसाहत करावी, व संतोषानें व सुखानें दिवस काढावे ह्मणून शि-

वाजी सतत झटे; व जहागीरदार वगैऱ्यांच्या जुलुमांतून मुक्त होण्यास सांपडलें, इतकेंच नव्हे, तर स्वकष्टार्जित मिळकत आपली आपणास भोगायास मिळून दोन तक्षिमा शिवाजीच्या शिवाजीकडेस गेल्या म्हणजे अकुतोभय राहूं शकूं, असा विचार करून परकी रयतही शिवाजीच्या मुलुखांत घुसूं लागे. तेव्हां शिवाजीच्या मुलुखांत सर्वत्र प्रायः आबादानी व स्वस्थता असून राज्याचें रहाटगाडगें व्यवस्थाशीर चाले, त्यांत नवल नाहीं. जो मुलुख शिवाजीचा नव्हता त्यांत मात्र मूर्तिमंत अव्यवस्थेचें अव्याहत राज्य होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं; कारण तसला मुलुख एकाएकीं फन्ना करून त्यांतील पैसा शिवाजीचे बारगीर व शिलेदार मिळून आपल्या धन्याच्या मुलुखांत केव्हां नेऊन ओततील, त्याचा मुळींच नियम नसे.

सहा किंवा सात तास निद्रेखेरीज या पुरुषास दुसरी विश्रांति ठाऊक नव्हती. सकाळीं उठल्यापासून तों रात्रीं अंतःपुरांत जाईपर्यंत शेंकडो व्याप यास करावे लागत. स्वतः यानें सुरतेवर व अन्यत्र बऱ्याच स्वाऱ्या केल्या. तोरणा किल्ला घेतल्यापासून तों इहलोकत्यागापर्यंत पावसाळ्याखेरीज शिवाजी कधींही स्वस्थ बसलेला नाहीं. पावसाळ्यांत देखील दसऱ्यानंतरच्या स्वारीची व्यवस्था करण्यांत गुंतून गेल्यामुळें, यास विशेष विसांवा मिळण्याचा संभव नव्हता. याप्रमाणें क्षणभर देखील विश्रांति न चाखतां व वैषयिक सुखाचा स्वाद न घेतां शौर्य, धैर्य, दाक्षिण्य, दया, सौजन्य, महामनस्त्व, गुणज्ञता, विमृश्यकारिता, गांभीर्य, मधुरभाषित्व, पर-

कपटप्रयोगप्रतीकारक्षमत्व, समयसूचकता, वाचंयमता, परेंगितज्ञता, शक्तित्रयसंपन्नता वगैरे आपले लोकोत्तर गुण व काटक शरीर मऱ्हाठ्यांचें हित करण्याच्या महासत्कार्यांत यानें लाविल्यामुळें अशेष महाराष्ट्रमंडळांत याचें नांव पुण्यश्लोकांच्या नांवाप्रमाणें पावनत्वानें स्मरणीय होऊन "सुभटशतनिशातखड्गधारां"नीं परिवारित असलेली दिल्लीपतीची श्री लक्ष्मी साशंक व सोत्कंप झाली.

---

## १०-शिकंदर, केसर, बोनापार्ट व शिवाजी या चार महापुरुषांमधील तारतम्य.

शिकंदर हा मोठा पराक्रमी बादशहा होऊन गेला, यांत संशय नाहीं. पण बापाच्या मरणानंतर ग्रीस देशांत स्वस्थता केल्यानंतर जी त्यानें इराणावर स्वारी केली, ती शुद्ध नांवासाठीं केली. अवरंगझेबाप्रमाणें शिकंदरास जगद्विजेतृत्व पाहिजे होतें. चेरोनियाची लढाई झाल्यानंतर दरोबस्त ग्रीक लोकांनीं आपणांस मदत करून इराणची पादशहात बुडवावी, ही मसलत मुळची शिकंदराच्या बापाची होय. इराणी लोकांची मासिडोनांवर सत्ता होती व त्यामुळें त्यांस इराणी लोकांनीं गांजून टाकिलें, असें कांहीं झालें नव्हतें. प्लाटीची लढाई झाल्यानंतर मासिडोनांबरोबर इराणी लोकांचा संबंध बिलकुल राहिला नव्हता. तेव्हां फिलिपनें इराणची पादशहात बुडविण्याचा निश्चय केला, तो कांहीं आपल्या लोकांस किंवा ग्रीक लोकांस त्यांच्या जुलमांतून सोडविण्यासाठीं ह्मणून केलेला नव्हे. तर हा निश्चय केवळ त्यानें आपला पराक्रम दाखविण्याच्या हेतूनें केला होता.

पण दैवयोगानें फिलिपचा त्याच्याच एका चिडलेल्या सरदारानें खून केला. पुढें बापाच्या मरणामुळें ग्रीक लोकांनीं पुंडाई माजविली होती ती मोडली, त्यांत कांहीं शिकंदरानें वावगें केलें नाहीं. पण ही पुंडाई मोडल्या-नंतर सर्वत्र मुलुखांत व्यवस्था लावून आबादानी करणें, हा शिकंदराचा पहिला धर्म होता. पण शिकंदरास हवा होता एक अलमगीरपणा. तो मिळावा, ह्मणून त्यानें इराणावर स्वारी केली. जी पादशहात शिकंदरानें बुडविली, ती अंतःकोपानें अत्यंत व्याकुळ व जर्जर झालेली होती. क्षर्क्षसचे ग्रीक लोकांनीं बारा वाजविल्या-नंतर इराणच्या पादशहातींत बिलकुल दम राहिला नव्हता. पादशहातीचे देसाई व देशमुख होते ते ठिक-ठिकाणीं पुंडाई करीत; व पादशहा ह्मणजे एका प्रकारची बाहुली होऊन राहिला होता. तेव्हां जी पादशहात शिकंदरानें बुडविली ती त्या काळीं कोणत्याही प्रकारें मरा झाली होती, असें ह्मणतां येत नाहीं; उलट ती सर्व प्रकारें मोडकळीस आलेली होती. जर शिकंदरास दूरवर धोरण असतें, तर इराणावर स्वारी करण्याच्या पूर्वीं त्यानें पहिल्यानें काबीज केलेल्या मुलुखाची पुरी व्यवस्था केली असती; व स्वामिनिष्ठेचा व देशनिष्ठेचा रोपा आपल्या पदरच्या प्रत्येक अधिकाऱ्याच्या हृदय-भूमींत लावून, तो देशाभिमानाच्या पाण्यानें वाढविला असता. पण हें खऱ्या शहाणपणाचें काम त्याच्या हातून न झाल्यामुळें, तो मरतांच सर्वत्र फुटाफूट झाली व त्याच्या पदरच्ये लोक त्याच्याच बायकोचा व मुलाचा खून करिण्यास चुकले नाहींत. तशांत शिकंदराचा बाप

स्वतः राजा असून, त्यानें शिकंदरास पुढें उपयोगीं पडलेलीं जवळ जवळ सर्व साधनें पूर्वींच जमवून ठेविलीं होतीं. शिवाजीचा बाप कांहीं राजा नव्हता. शहाजीनें पुष्कळ पैसा तरी सांचवून ठेविला होता, असेंही नाहीं. तरी शिवाजीनें केवळ आपल्या अक्कलेच्या बळानें जो योग झाला तो वायां जाऊं न देतां, सर्व साधनें हळू हळू संपादन करून अपूर्व मऱ्हाठेशाहीचा पाया घातला. जी पादशहात बुडविण्यास शिवाजीनें आरंभ केला, ती कांहीं इराणच्या पादशहातीप्रमाणें मोडकळीस आलेली नव्हती. त्या पादशहातीचा पाया बाबरनें घातलेला असून, त्या पायावर अकबरानें एक भव्य इमारत उठवून दिली होती. अकबराच्या पाठीं जहांगीर व शहाजहान झाले, त्यांनींही ती इमारत आजूबाजूस वाढविलेली होती. काबुलावर जेव्हां शहाजहानानें लश्कर पाठविलें, तेव्हां त्याच्याजवळ पैसा इतका उमाप झाला होता, कीं दरोबस्त लश्कराचा दोन वर्षांचा पगार आगाऊ देऊन दोन वर्षें पुरे इतकी सामग्री खरेदी करून त्यास बरोबर पाठवितां आली. इतकेंच नाहीं, तर ताजमहालासारखी जगद्विख्यात मान डोलवूं लाविणारी इमारत उठवून, कोट्यावधी रुपये शहाजहानास सिंहासनावरही खर्चण्यास अडचण पडली नाहीं. अशा प्रकारें मातत जाऊन अफाट झालेली संपत्ति थोड्याच दिवसांत भ्रातृवध करून अजीर्णाशिवाय अवरंगझेबानें साफ पचविली. अवरंगझेबाजवळ पाहिस्तेखानासारखे मोंगल व दिलेलखानासारखे पठाण होते, तेही इतरत्र बऱ्याच लढाया मारून नांवाजलेले होते. तेव्हां ज्या दिल्ली-

पतीच्या छातीवर पाय देऊन मऱ्हाठ्यांच्या पादशहातीची शिवाजीनें प्राणप्रतिष्ठा केली, तो मोठा धनाढ्य व बलाढ्य होता. शिवाजीनें आपल्या पदरच्या प्रत्येक लहान मोठ्या अधिकाऱ्याच्या व शिपायाच्या हृदयभूमींत लाविलेल्या स्वामिनिष्ठेच्या व देशनिष्ठेच्या रोप्यानें देशाभिमानाचें पाणी वर हवें तितकें ओतलें गेल्यामुळें मुळें इतकीं खोल धरिलीं होतीं, कीं त्याच्या पश्चात् संभाजीसारख्या मुलाच्या गैरवर्तणुकीनें जरी महाराष्ट्रमंडळास बराच धक्का पहिल्यानें पोंचला, तरी शिवाजीचें पुरें शिष्यत्व संपादन केलेल्या संताजी, धनाजी, प्रल्हादपंत व रामचंद्रपंत या थोर पुरुषांनीं पुढें सरसावून सगळा मंडळाचा भार आपल्या डोकीवर घेतला; व हिंदुस्थानांतल्या पैशास व दाण्यास दक्षिणेंत खेळण्यास लावून व अवरंगझेबास अगदीं हैराण करून, अखेरीस अकृतार्थच प्राणत्याग करावयास लाविलें. थीब्स् वगैरे शहरें घेतल्यानंतर शिकंदरानें विनाकारण कत्तल करण्यास जसे हुकुम दिले, तसे शिवाजीनें कधींही दिले नाहींत, व सुरादेवीनें मत्त होऊन अमोलिक ग्रंथसंग्रहही जाळले नाहींत. शरण आलेल्या व बंदीवान् झालेल्या लोकांची कत्तल करण्यास शिवाजीनें कधींही हुकुम केला नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांचा चांगला समाचार घेत जाऊन जखमा बऱ्या होतांच त्यांस त्यांच्या धन्याकडेस पाठविण्याचें वीरव्रत आमरण त्यानें कधींही मोडिलें नाहीं. सारांश, शिकंदर हा निसर्गतः क्रूर व सुरेचा निःसीम उपासक असून, साक्षात् जगन्नियंत्याचा अवतार आपणास समजत असल्यामुळें केवळ आपलें स्वच्छंद निग्रहानुग्रहकारित्व दाखविण्यासाठीं

रक्तपातही करण्यास पाठींपुढें पहात नसे. पण शिवाजी हा दयासागर असून सुरादेवीस "दुर्गतिची मावली" समजणारा पडला, व त्याचा मोठा हेतु आपल्या पयोदात्रीस अविंधांच्या जुलमांतून मुक्त करण्याचा होता. ह्मणून निग्राह्यांचा निग्रह व अनुग्राह्यांवर अनुग्रह प्रायः रक्तपाताशिवाय करून, क्वचित् रक्तपात करावाच लागला, तर शरण येत किंवा अबलासखानाप्रमाणें जखमी होत त्यांस लागलीच कोणत्याही रीतीनें पंक्तिभेद न करितां अभयदक्षिणा देऊन, ज्याप्रमाणें मित्रांपासून त्याप्रमाणें शत्रूंपासूनही त्यानें वहावा मिळविली.

केसर ( सीझर ) हा मोठा शूर असून जसा मुलुख जिंकण्यांत तसा जिंकलेल्या मुलुखाची व्यवस्था लाविण्यांतही कुशल होता. पण आठ वर्षें गाल ( फ्रान्स ) देशाची सुभेदारी करीत असतां संचित केलेल्या पैशाचा व आज्ञांकित असून कसलेल्या लश्कराचा हवा तसा विनियोग करितां आल्यामुळें त्याचें पारडें लौकरच जड झालें, त्यांत नवल नाहीं. हा थोर पुरुष जर अधिक जगता, तर रूमी उमरावांस व सरदारांस नमवून त्यांच्या जुलमांतून इतर लोकांस तो निःसंशय मुक्त करिता. पण परप्रयुक्त कावा व कपट परासच नडेसें करण्याचें शिवाजीचें शहाणपण व धोरण आंगीं नसल्यामुळें केसरास ब्रूटसप्रभृति मंडळीच्या हातून प्राणास मुकावें लागलें. जर कोशसंपद् व दंडसंपद् या दोहोंचा जन्मापासून शिवाजीजवळ होता तसा अभाव असता, तर केसराच्या हातून लोककल्याणासाठीं कितपत यत्न होता व तें किती झालें असतें, याचा वानवाच आहे. तरी केसराच्या

कृतींमध्यें परार्थपणा पुष्कळ होता, यांत शंका नाहीं.

बोनापार्टानें आपल्या क्रमाच्या अगदीं आरंभीं देशाची जी भक्ति केली, ती निःसंशय निष्काम भक्ति केली. जर हा महापुरुष जन्मला नसता, तर राजांच्या व उमरावांच्या दुःसह जुलुमांतून नुक्तेंच आपणास मुक्त करून घेतलेल्या फ्रेंच लोकांस इतर राजांनीं नमवून, पुनः निरंकुश राजाच्या अंकुशाखालीं चिर चिर करण्यास लाविलें असतें. तेव्हां राज्यक्रांति झाल्यानंतर जी मोठी पुंडाई चालली होती, ती मोडून व्यवस्था लाविली, हें एक मोठें काम बोनापार्टानें उरकलें, यांत संशय नाहीं. पण कांहीं दिवसांनीं स्वतःच्याच पराक्रमानें त्याचे डोळे दिपून गेल्यामुळें, आपण मोठ्या निगेनें वाढविलेल्या वृक्षास आपल्याच हातानें एकदम तोडून बादशहा बनण्यांत व इतर राजांचा व त्यांच्या लोकांचा विनाकारण उपमर्द करण्यांत त्यास कांहींच अनन्वितत्व भासलें नाहीं. जसा शिवाजीचा तसाच बोनापार्टाचा सर्वत्र दरारा होता. जसे दरोबस्त मऱ्हाठे शिवाजीचे दास बनून गेले होते, तसेच फ्रेंच लोक बोनापार्टाचे दास बनून गेले होते. तेव्हां जर कोणत्याही प्रकारची आंतील व्यवस्था बोनापार्ट लाविण्यास यत्न करिता, तर ती त्याच्या हातून सहज तडीस जाती. पण बादशहा बनल्या दिवसापासून केवळ शिपाईपणाच्या व विजिगीषुत्वाच्या व्यसनांत आकंठ बुडून गेल्यामुळें जरी पहिल्यानें त्यास बरेंच यश आलें, तरी रूस लोकांनीं पुढें त्यास पुष्कळ हैराण केलें; व अखेरीस वेलिंगटन व ब्लूचर या दोहोंच्याही तावडीस सांपडून हेलिनासारख्या एका ओसाड व एकल-

कोंड बेटांत समुद्राच्या लाटा मोजीत बसावें लागलें. शिवाजीनें तर आपलें उभयकुळदीपकत्व व देशदीपकत्व अगदीं अखेरपर्यंत सर्वत्र विदित केलें; व दिलेलखानास शेवटीं काळें तोंड करण्यास लावून, विकट प्रसंगीं आपल्या बापास आश्रय देणाऱ्या विजापुरच्या अविंध पादशहातीस आपल्या जिवांत जीव असे तोंपर्यंत अकुतोभय रहाण्यास सांगितलें. इतकेंच नाहीं, तर आपलें "यशःशरीर" आचंद्रार्क स्थिर केल्यानंतर, आपल्या राजधानींत विश्वासू हुजरे व कारकून सभोंवतीं बसले असतां, आपला वरद हस्त पहिल्यानें त्यांच्या मस्तकावर नी ठेविला व तदनंतर या अशाश्वत पिंडाचा त्याग केला. अफझुलखानासारखा किंवा अवरंगझेबासारखा आनखशिखाग्र कपटानें भरलेला प्रतिपक्षी जर शिकंदरास, केसरास किंवा बोनापार्टास मिळता, तर त्याच्यापुढें तिघांपैकीं कोणाचाही टिकाव लागताना.

सारांश, जिंकलेल्या मुलुखाची व्यवस्था लावून पदरच्यांची आपणाविषयीं निष्ठा उत्पन्न करून वाढविण्याचें शहाणपण जें शिकंदरास नव्हतें तें शिवाजीस होतें; इतकेंच नाहीं, तर केसराप्रमाणें प्राणास न मुकतां चिंतित जनाहित करून, बोनापार्टाप्रमाणें मध्येंच स्वार्थासक्ति न दाखवितां मरेपर्यंत आपलें आयुष्य केवळ दरोबस्त मऱ्हाठ्यांस अविंधांच्या दुःसह जुलुमांतून मुक्त करण्यांत खर्चिलें. तेव्हां महाराष्ट्रमंडळांतील आबालवृद्ध लोक शिवाजीस परम पुरुषाचा अवतार मानितात, त्यांत कांहीं नवल नाहीं.

---

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | पंक्ती. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २२ | २० | ९— | ६— |
| २८ | २४ | भोईं | भोई |
| ३४ | २३ | आ | अ |
| ३७ | १२ | व | र्व |
| ४४ | १७ | अल महा | अलम हा |
| ५२ | १० | प्रा | प्र |
| ६४ | ६ | स्त | स्तीं |
| ६७ | ११ | आ | गे |



# जाहिरात.

हें चरित्र मुंबई मराठा हैस्कूल, गिरगांव. या पत्त्यावर विकत मिळेल.—टपालासह किं० ३॥ आणे.

---

दुसऱ्याच्या विशेष मदतीवांचून सहज वाचतां येईल असें

## मराठी बालबोध पहिलें पुस्तक.

या पुस्तकाच्या उपयुक्ततेविषयीं किलेक विद्वान व विद्यावृद्धेच्छु गृहस्थांनीं, तसेंच वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें यांनीं फार चांगले अभिप्राय दिले आहेत. हें पुस्तक मुंबईतील स्टु. लि. व सा. सोसाईटीच्या सर्व मुलींच्या शाळांतून आणि थि. आसोसिएशनच्या रात्रीच्या शाळांतून चालू आहे. मनोरंजनार्थ ७२ सुंदर चित्रें आहेत. अक्षर सुढळ व मोठें आहे. मुलांस अवश्य अशा सुबोधपर गोष्टी आहेत. अक्षर ओळख लवकर होऊन चांगलें वाचतां येईल अशी सुगम व्यवस्था केली आहे. परशापेंतील लोकांस वाचावयास शिकविण्याचे कामास सुद्धां फार उपयोगी आहे. किंमत २ आणे टपालखर्च अर्धा आणा.

पुस्तकें गिरगांव ट्रामवेस्टेशनावर रा. रा. महादेव कृष्ण मराठे यांजकडे मिळतील.

मुंबई,—"धी जॉइंट-स्टॉक" प्रिन्टिंग प्रेस.